* केंद्रामध्ये वेळोवेळी विविध प्रकल्पांतर्गत निर्माण केलेली पायाभूत माहितीचे संगणकीकरण भौगोलिक माहिती प्रणालीनुसार करण्यात आली आहे. यासाठी केंद्रात स्वतंत्र राज्य संपदा माहिती व्यवस्थापन प्रणाली (SRIMS) कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे उपलब्ध माहितीची इतर संलग्न सांख्यिकी माहितीशी सांगड घालून एकात्मिक अभ्यास करणे शक्य होते. त्यामुळे संपदा विकासाचे आराखडे अधिक परिणामकारक आणि संयुक्तीक करणे शक्य होते.

*महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (RS) रेडिओ प्रणाली (GIS) (भौगोलिक माहिती प्रणाली) डेटा निर्मिती संकलनाची गरज पूर्ण करण्यासाठी जिल्हास्तरीय (GIS) भौगोलिक माहिती प्रणाली सेवा केंद्र स्थापन करण्याची योजना करत आहे. यामुळे महाराष्ट्र राज्याला वैज्ञानिकदृष्ट्या योग्य संसाधन डेटाबेसवर आधारित राज्यांच्या सर्वांगीण विकासासाठी रेडिओ प्रणाली भौगोलिक माहिती प्रणाली तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल.

* केंद्राच्या सुरळीत आणि प्रभावी कामकाजासाठी मशीन, उपकरणे, संगणक प्रणाली, फर्निचर आणि इमारत यासारख्या विद्यमान सुविधा वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक आहे. हे पाहता, वैज्ञानिक उपकरणे खरेदी करण्यासाठी आणि प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य सुदूर संवेदन उपयोजन केंद्र यांना आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी राज्य शासनाकडून १००% आर्थिक सहाय्य देण्यात येते. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य सुदूर संवेदन उपयोजन केंद्र तसेच मुंबई व पुणे येथील नवीन शाखा कार्यालयासाठी आस्थापना यंत्रसामग्री व इतर अनुषांगिक बाबींवरील खर्च भागविण्यासाठी तसेच पायाभूत सुविधांसाठी अपेक्षित खर्चाचा समावेश आहे.

* महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर ह्यांना प्रमुख संस्था (Nodal Agency) म्हणून कार्य पार पाडण्यासाठी व "महाराष्ट्र डीजीटल भौगोलीक माहिती संच प्रणाली" (Maharashtra Geospatial Digital Database System-MGDDS.- MahaBHUMI) आगामी चार वर्ष कालावधीत विकसित करण्यासाठी एकूण अपेक्षित खर्च रुपये ३११.१७ कोटी इतका मंजूर केला आहे. महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्रासाठी वर्ष २०२२-२३ साठी रुपये ७८.१० कोटी नियतव्यय मान्य करण्यात आला असून वर्ष २०२३-२४ साठी रुपये १५०.०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**५. विकास मंडळे :** राज्य विधी मंडळाने पारित केलेला ठराव स्वीकृत करून दिनांक ९ मार्च, १९९४ रोजी राष्ट्रपतींनी प्रसृत केलेल्या आदेशाद्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे स्थापन करण्याची विशेष जबाबदारी घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये सोपविली. मा. राष्ट्रपतींच्या महोदयांच्या उपरोक्त आदेशाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी दिनांक ३० एप्रिल, १९९४ रोजी "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश- १९९४" निर्गमित करून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे स्थापन केली. या मंडळांवर मा. अध्यक्ष तसेच इतर सदस्यांची दिनांक २५ जून, १९९४ च्या आदेशान्वये नियुक्ती करून कामकाजास सुरूवात झाली. आता, मा. राज्यपाल यांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश-२०११" निर्गमित केले असून सदर आदेशाद्वारे "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश-१९९४" अधिक्रमीत करण्यात आलेले आहेत.

मंडळांची कार्यक्षेत्रे व कामे पुढीलप्रमाणे आहेत :--

**(१) विकास मंडळाची कार्यक्षेत्रे :** या मंडळाची कार्यक्षेत्रे पुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील :

| | | |
|---|---|---|
| १) विदर्भ विकास मंडळ | - | नागपूर, अमरावती महसूल विभाग |
| २) मराठवाडा विकास मंडळ | - | औरंगाबाद महसूल विभाग |
| ३) उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ | - | कोकण, पुणे आणि नाशिक महसूल विभाग |

**(२) विकास मंडळाची कार्ये :** विकास मंडळ, वेळोवेळी :--

(अ) मंडळांची साधनसंपत्ती, गरजा व संधी यांचा विचार करून आणि संपूर्ण राज्याचा विकास लक्षात घेऊन, त्याच्या कार्यक्षेत्राच्या संबंधात संभाव्य सामाजिक-आर्थिक विकासाची निश्चिती करील,

(ब) विकास मंडळांच्या कार्यक्षेत्रांमध्ये ज्यांच्यावर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असेल अशी क्षेत्रे/भाग/लोकसंख्या गट निश्चित करील,

(क) प्रादेशिक/जिल्हा विकास अहवाल तयार करील आणि ते नियतकालाने अद्ययावत करील. प्रादेशिक/जिल्हा विकास अहवालांमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल :-

(एक) स्थानिक मानवी व नैसर्गिक साधनसंपत्तीचे निर्धारण व संभाव्य सामाजिक-आर्थिक विकास यांचे पृथ:करण,

(दोन) संबंधित सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या विकास निर्देशांकानुसार महत्त्वाच्या लोकसंख्या गटांची विकास स्थिती,

(तीन) आरोग्य, शिक्षण व उपजिविकेचे प्रश्न यासारख्या मानवी विकास निर्देशांकाच्या विकास स्थितीची संगणना,

(चार) प्रदेशांची साधनसंपत्ती व संभाव्य भौगोलिक स्थिती यांच्या आधारे प्रादेशिक विकास योजनेचा आराखडा,

(पाच) योजनेच्या कार्यक्रमाच्या आणि संपूर्ण प्रादेशिक विकासाच्या निर्धारणावरील व मुल्यमापनावरील परिणाम.

(ड) वार्षिक, तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात गरजाधारित संतुलित प्रादेशिक विकास विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रावरील विकास खर्चाच्या पातळ्या सुचवेल,

(ई) मंडळाच्या कार्यक्षेत्रांच्या सर्वांगिण विकास साधण्याच्या दृष्टिने तसेच त्या भागातील विकासाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टिने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामांचे मुल्यमापन करेल,

(फ) मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करेल व तो, महाराष्ट्र राज्य विधानमंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करेल.

**(३) विकास खर्चासाठी निदेश देणे व निधीचे वाटप :-**

(अ) राज्याची एकूण गरज साकल्याने विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रांवरील विकास खर्चासाठी, महाराष्ट्राचे राज्यपाल, निधीचे समन्यायाने वाटप व्हावे याची खातरजमा करतील.

(ब) निधीची समन्यायाने वाटप होईल याची खातरजमा करतांना राज्यपाल-

(एक) विकास मंडळाने कोणत्याही शिफारशी केल्या असल्यास त्या विचारात घेतील; आणि

(दोन) निधीच्या वाटपाच्या बाबतीत, मा. राज्यपाल त्यांना आवश्यक आणि योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्तीसंघाचा सल्ला घेऊ शकतील.

विकास मंडळे मा. राज्यपालांच्या नियंत्रणाखाली आहेत. विकास मंडळाच्या कामाकरिता शासनाचे विविध विभाग, विकास मंडळे आणि राज्यपालांचे कार्यालय यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी नियोजन विभागात एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे.

**(४) विभागीय असमतोल व अनुशेष दूर करणे :-**

निर्देशांक व अनुशेष समितीने निश्चित केलेला आर्थिक अनुशेष दूर करण्यासाठी सन १९९५-९६ पासून तरतूद करण्यात येत आहे. निर्देशांक व अनुशेष समितीने अनुशेषाचे विश्लेषण करताना खाजगी क्षेत्राकडे दुर्लक्ष करून केवळ सरकारी गुंतवणुका विचारात घेतल्या होत्या. परंतु उदयास येत असलेल्या नवीन आर्थिक परिस्थितीत आधारभूत सुविधा (रस्ते, सिंचन व वीज क्षेत्र) त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रे (आरोग्य व शिक्षण) यांमध्ये खाजगी क्षेत्राने केलेल्या कार्याकडे दुर्लक्ष करता येऊ शकत नाही. सध्या, राज्य शासनाने सार्वजनिक खाजगी भागीदारी (पी.पी.पी.) पद्धतीच्या माध्यमातून रस्ते, पूल आणि सिंचन यांचे बांधकाम आणि ऊर्जा प्रकल्प यासारखे काही पायाभूत प्रकल्प हाती घेण्याचे धोरण अंगीकारले आहे. सामाजिक क्षेत्रात देखील खाजगी क्षेत्राद्वारे मोठ्या संख्येने शाळा, तंत्र, अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येत आहेत. खाजगी क्षेत्रातील या उपक्रमांतील बहुतेक उपक्रम जास्तीत जास्त लाभ मिळविण्याच्या हेतूने प्रेरित आहेत, असे लाभ आधीच विकसित झालेल्या प्रदेशातच केवळ शक्य आहेत. या प्रक्रियेद्वारे केलेल्या विकासात राज्यातील विकसित व मागास जिल्ह्यांमध्ये दरी वाढण्याचा एक स्वाभाविक धोका आहे.

अनुशेषाच्या अंदाजावर लक्ष केंद्रित करीत असलेल्या सध्याच्या पद्धतीमध्ये सर्व प्रदेशांना विकासाच्या समान पातळीवर आणण्याची अट घालण्यात आली आहे. तिच्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साध्य करण्यासाठी, प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी विचारात घेण्यात आलेल्या नाहीत. या पद्धतीत विशिष्ट प्रदेशाची शक्ती उपयोगात आणण्यासाठी आणि तिच्या दुर्बलतेचे तोटे कमी करण्यासाठी फारच थोडा वाव आहे. साधनसामग्रीचे समन्यायतेने नियत वाटप करण्याची खात्री करून घेत असताना एखाद्या प्रदेशातील स्पर्धात्मक लाभ देखील विचारात घेण्याची गरज आहे.

निर्देशांक व अनुशेष समितीचा दृष्टीकोन पुरवठा करण्याकडे आणि रोख मागास क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्याकडे होता. हा दृष्टीकोन उत्पादन क्षमता, उत्पन्न, आरोग्य व शिक्षण यांच्या दर्जातील वाढ आणि व्यक्तीचे कल्याण यांसारख्या सुस्पष्ट निर्देशांकांनुसार केलेल्या गुंतवणुकीच्या परिणामांवर केंद्रित नाही. आतंरराष्ट्रीय मानव विकास निर्देशांक (एचडीआय) आणि उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, स्त्री शक्ती बळकटीकरण व समन्याय यासारख्या घटकांच्या एकत्र येण्यातून बनलेल्या इतर स्त्री-पुरुष संबंधातील निदेशक, यासारख्या प्रदेश विकासाच्या मुल्यांकनांचा अनेक नवीन दृष्टीकोनातून विचार केला जात आहे.

वरील निरीक्षणांच्या अनुरोधाने मा. राज्यपालांचे असे मत आहे की, अनुशेष आणि विकास खर्चाचे समान वितरणाच्या नव्या दृष्टीने विचार करून देणारे पर्यायी मार्ग शोधणे अत्यावश्यक आहे, म्हणून तीनही प्रदेशातील विविध क्षेत्रातील विद्यमान स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या समस्या लक्षात घेण्यासाठी आणि सर्व संबंधितांची मते विचारात घेऊन संतुलित प्रादेशिक विकासाच्या मुद्यांवर लक्ष देण्यासाठी आणि खर्चाच्या समान न्याय्य वाटपासाठी समुचित नियत वाटपाची तत्त्वे सूचित करण्यासाठी तज्ञांची एक समिती गठित करावी.

मा. राज्यपालांच्या उपरोक्त शिफारशीनुसार डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ मे, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये तज्ञांची एक समिती गठित करण्यात आली होती. समितीने आपला अहवाल दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३ रोजी मा. राज्यपाल महोदयांना सादर केला आहे. समितीच्या अहवालातील शिफारशी व त्यावरील प्रशासकीय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन अहवालातील शिफारशी स्विकारण्या संदर्भात अहवाल सादर करण्यासाठी मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे.

**६. डोंगरी विभागाच्या विकासासाठी कृती कार्यक्रम**

राज्याच्या वार्षिक योजनेची आखणी करीत असताना डोंगरी/दुर्गम क्षेत्रात पायाभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याचे आणि डोंगरी विभागाच्या काही विशेष गरजा असल्याचे आढळून आले. राज्यातील डोंगरी विभागाचे विकासासाठी खास कार्यक्रम घेण्याच्या हेतूने शासनाने ऑक्टोबर, १९८८ मध्ये मंत्रिमंडळाची एक उपसमिती नेमली होती. डोंगरी विभागाचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या उपसमितीने ठरविलेले निकष ग्राह्य धरण्यात आले. त्यानुसार खालीलप्रमाणे पूर्णगट डोंगरी तालुके व उपगट डोंगरी तालुके निश्चित करण्यात आले.

(१) डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत एखाद्या भौगोलिक भागास डोंगरी भाग समजण्यासाठी त्या क्षेत्राचा सरासरी उतार ३० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असेल, व त्या भागाची सापेक्ष उंची ३०० मीटरहून जास्त असेल, अशा क्षेत्रास "प्रमुख डोंगरी क्षेत्र" व त्याखेरीज सरासरी भौगोलिक उतार हा १७ टक्के ते ३० टक्के असल्यास, "अंशत: डोंगरी क्षेत्र" म्हणून गणले जाते.

(२) वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे किमान क्षेत्रफळ १०० चौ.कि.मी. असणे आवश्यक आहे.

(३) एखाद्या तालुक्यात वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे क्षेत्रफह तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास तो तालुका पूर्णगट डोंगरी तालुका समजण्यात येतो.

(४) तसेच डोंगरी भागाचे क्षेत्रफळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या २० टक्के पेक्षा जास्त परंतु ५० टक्के पेक्षा कमी असल्यास तो तालुका उपगट डोंगरी तालुका समजण्यात येतो.

२. राज्यातील २२ जिल्ह्यांतील ७३ तालुके (पूर्णत:) व ३५ तालुके (अंशत:) यांना डोंगरी क्षेत्र म्हणून घोषित केले होते. शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे नविन तालुक्यांची निर्मिती केल्यामुळे, **अस्तित्त्वातील डोंगरी तालुक्यांच्या विभाजनाने नव्याने निर्माण झालेल्या, दोडामार्ग, त्र्यंबकेश्वर, माहूर या तीन पूर्णगट व विक्रमगड, देवळा, फुलंब्री या तीन उपगट तालुक्यांचा समावेश डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात दि. १५-६-२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आला आहे. त्यानुसार डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाअंतर्गत २२ जिल्ह्यातील ७६ तालुके (पूर्णत:) व ३८ तालुके (अंशत:) समाविष्ट आहेत.**

३. या कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी योग्यप्रकारे व्हावी यासाठी संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती नेमण्यात आली आहे. या योजनेखाली अनुज्ञेय असलेल्या खालील कामांपैकी समिती कामांची शिफारस करु शकते. या योजनेखाली अनुज्ञेय असणाऱ्या खालील प्रकारच्या प्रत्येक कामासाठी रु. १५.०० लाखाची मर्यादा आहे.

**डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या अनुज्ञेय कामांची यादी**

**(१) प्राथमिक शिक्षण-**

(अ) शासकीय प्राथमिक शाळांच्या नवीन खोल्यांचे बांधकाम.

(ब) शासकीय प्राथमिक शाळा खोलीची विशेष दुरुस्ती.

(क) शासकीय प्राथमिक शाळांसाठी संगणक संच व शैक्षणिक आज्ञावली (सॉफ्टवेअर) (ग्रामविकास विभागाच्या सल्ल्याने व जिल्हा नियोजन समितीच्या मंजूरीने विहित पध्दतीनुसार खरेदी करणे).

**(२) पाटबंधाऱ्यांची कामे-**

(अ) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे

(ब) लघु-पाटबंधारेची कामे

(क) उपसा जलसिंचन योजना

**(३) रस्ते विकासाची कामे-**

(अ) लहान रस्ते (खडीकरण)

(ब) मिसिंग लिंक

(क) छोटे पूल

(ड) ३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण (सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणकानुसार)

(इ) नळकांडी पूल

(ई) साकव

(प) रस्त्यावरील मोरीचे काम

(फ) लहान नाल्यावर फरशी बांधणे

(ज) फूटब्रीज

(ह) अरुंद बोळवजा रस्ते व गटारांचे कॉक्रीटीकरण

**(४) पाणी पुरवठ्याची कामे (ग्राम विकास विभागाच्या प्रमाणकानुसार)**

(अ) ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या लहान योजना

(ब) ज्या गावातील नळपाणी पुरवठा योजना अगोदरच झाल्या असतील अशा गावातील वाड्यांसाठी जादा पाईपलाईन टाकून वाड्यांना पाणीपुरवठा करण्यासंबंधीची कामे

(क) गावांसाठी/वाड्यांसाठी विंधण विहिरी

**(५) समाज मंदिरे**

**(६) सामाजिक सभागृहे**

**(७) उपसा जलसिंचन योजना व त्याच्या दुरूस्त्या**

**(८) एस. टी. निवारा (पिकअप शेड)**

**(९) अंगणवाडीसाठी इमारतींचे बांधकाम**

**(१०) सौर ऊर्जेवरील दिवे**

**(११) विद्युत विकासाची कामे**

४. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षापासून निधीमध्ये वाढ करण्यात आली असून, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डोंविका-२०२०/प्र.क्र.५३ / का १४८१-अ, दिनांक २६-०२-२०२१ अन्वये "पूर्णगट" डोंगरी तालुक्यासाठी "रुपये २.०० कोटी" आणि "उपगट" डोंगरी तालुक्यासाठी "रुपये १.०० कोटी" निधी मंजूर करण्यात आला आहे.

५. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ साठी खालीलप्रमाणे नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

(रुपये कोटीत)

| वार्षिक योजना २०२२-२०२३ | | वार्षिक योजना २०२३-२४ |
|---|---|---|
| नियतव्यय | अपेक्षित खर्च | नियतव्यय |
| १९०.०० | १९०.०० | १९०.०० |

**(२) वित्तीय आवश्यकता : Financial Requirement :**

**विवरणपत्र-एक** STATEMENT-I

(रुपये हजारात) (Rs. in thousands)

| अ. क्र. Sr. No. | क्षेत्राचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | | सुधारित अंदाज २०२२-२०२३ Revised Estimate 2022-2023 | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ Budge Estimates 2023-2024 | | | Name of the Sector |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expenditure | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expenditure | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expenditure | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expenditure | एकूण Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | |
| (ब) | ४५५१-डोंगराळ क्षेत्रे... यावरील भांडवली खर्च ०१, पश्चिम घाट, ०६० इतर डोंगराळ क्षेत्रे (००), (००)(०१) डोंगराळ क्षेत्राकरिता विशेष विकास कार्यक्रम (कार्यक्रम) | | 1520853 | 1520853 | .. | 1900000 | 1900000 | .. | 2000000 | 2000000 | .. | 1900000 | 1900000 | 4551, Capital outlay on Hill Areas 01, Western Ghats 060, Other Hill Areas (00), (00)(01) Special Development programme for Hill Areas (Scheme) |
| | एकूण | | 1520853 | 1520853 | .. | 1900000 | 1900000 | .. | 2000000 | 2000000 | .. | 1900000 | 1900000 | .. Total |

## ७. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे :

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे या संस्थेची स्थापना कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ अंतर्गत राज्य शासनाची स्वायत्त संस्था म्हणून झालेली आहे. प्रत्यक्षात सदर संस्था दिनांक ११/०२/२०१९ पासून कार्यान्वित झाली आहे. ही संस्था "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर लक्षित गटातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी प्रवर्गाच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कार्यरत आहे. संस्थेकडे सध्या स्वत:चे कोणतेही इतर उत्पन्नाचे स्त्रोत नसल्यामुळे ती शासनाच्या अनुदानावर कार्यरत आहे.

**सन २०१८-१९ पासून या संस्थेस पुढीलप्रमाणे शासन अनुदान प्राप्त असून खर्च पुढीलप्रमाणे आहे.**

| आर्थिक वर्ष | मंजुर अनुदान (कोटी) | वितरित अनुदान (कोटी) | मागिल वर्षाची शिल्लक रक्कम (कोटी) | खर्च (कोटी) |
|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ५.०० | ५.०० | .. | २.४८ |
| २०१९-२० | ५०.०० | २८.८० | .. | २३.०८ |
| २०२०-२१ | १३०.०० | ३३.६५ | .. | २६.५० |
| २०२१-२२ | २९५.४५ | २९५.४५ | .. | ७३.८० |
| २०२२-२३ | ३००.०० | ५.८३ | २२१.६५ | ४४.१८ |

**चालू वर्ष २०२२-२३ मध्ये राबविण्यात येणाऱ्या योजना खालीलप्रमाणे :**

* एम.फील. व पी.एच.डी. च्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती-२१०९ विद्यार्थी.

* संघ लोकसेवा आयोगाच्या पूर्व परिक्षेसाठी प्रशिक्षण-५०३ विद्यार्थी

* संघ लोकसेवा आयोगाच्या मुख्य परिक्षा (२०२२) च्या तयारीसाठी एकरकमी मदत रु. ५०,०००/- प्रति विद्यार्थी-१७४ विद्यार्थी

* संघ लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीच्या तयारीसाठी एकरकमी मदत रु. २५,०००/- प्रति विद्यार्थी-४७ उमेदवार.

* संघ लोकसेवा आयोग परिक्षेमार्फत निवड झालेले विद्यार्थी-१२ विद्यार्थी

* संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय वनसेवा मुख्य परिक्षा (२०२१) च्या तयारीसाठी एकरकमी मदत रु. ५०,०००/- प्रति विद्यार्थी-१२ विद्यार्थी

* संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय वनसेवा मुख्य परिक्षा (२०२१) मुलाखतीच्या तयारीसाठी एकरकमी मदत रु. २५,०००/- प्रति विद्यार्थी-४ उमेदवार

* संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी मुख्य परिक्षा (२०२१) मुलाखतीच्या तयारीसाठी एकरकमी मदत रु. २५,०००/- प्रती विद्यार्थी-६ उमेदवार

* महाराष्ट्र लोकसेवा आयोग पूर्व परीक्षा-२०२१ प्रशिक्षण वर्ग-२५० उमेदवार

* महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुख्य परीक्षा २०२२ च्या तयारीसाठी एकरकमी रु. १५,०००/- प्रती विद्यार्थी-२६४० उमेदवार

* महाराष्ट्र तांत्रिक सेवा परिक्षा २०२१ च्या तयारीसाठी एकरकमी रु. १५,०००/- प्रती विद्यार्थी-१९६८ उमेदवार

* महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची दुय्यम सेवा-अराजपत्रित स्पर्धा परिक्षा ऑनलाईन प्रशिक्षण ३३५१ विद्यार्थी.

* कर्मचारी निवड आयोगाची अराजपत्रित पदांच्या स्पर्धा परिक्षा ऑनलाईन प्रशिक्षण ९२३ विद्यार्थी.

* महाराष्ट्र (राज्यसेवा) मुख्य परीक्षा २०२१ च्या तयारीसाठी एकरकमी रु. १५,०००/- प्रती विद्यार्थी-२७४ उमेदवार

* राष्ट्रीय गुणवत्ता आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना-नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी. प्रती विद्यार्थी रु. ९६००/- प्रमाणे एकूण लाभार्थी उमेदवार-२०००० विद्यार्थी

* शासनाने सारथी संस्थेच्या मुख्यालयासाठी पुणे येथे जमीन उपलब्ध करून दिली असून इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचेमार्फत प्रगतीपथावर असून बांधकामासाठी रु. ४२.७० कोटी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना देण्यात आलेले आहेत.

आर्थिक वर्ष सन २०२३-२४ साठी अंदाजित अनुदान मागणी शासकीय कर्मचारी व अधिकारी वेतन रु. ५.६५ कोटी, बाह्यस्त्रोत कर्मचारी वेतन रु. ६.०० कोटी व वेतनेत्तर अनुदान रु. २५०.०० कोटी आणि बांधकामासाठी रु. १५०.०० कोटी इतकी आहे.

तसेच या व्यतिरिक्त सारथी संस्थेमार्फत खालील योजना प्रस्तावित आहेत.

* न्यायिक सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण.
* राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यक्रम.
* युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक प्रशिक्षण योजना.
* संगणक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आर्थिक मदत.
* परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.
* सारथी मुख्यालय इमारत बांधकाम पूर्ण करणे.
* सारथी व्हिजन डॉक्युमेंट-२०३० पूर्णत्वास नेणे.

## ८. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राज्यात राज्य शासनातर्फे शैक्षणिक , आर्थिक उन्नती व सामाजिक प्रगतीसाठी समाजातील वेगवेगळ्या प्रवर्गासाठी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या समाजाचा सामाजिक विकास करणे, विशेष करुन या समाजातील बेरोजगार तरुणांकरिता रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गटातील युवकांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रशासनाने दिनांक २७-११-१९९८ रोजी कंपनी कायद्याखाली नोंदणी करुन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली. शासन निर्णय क्र. अपाम २०१६/प्र.क्र. १८७/रोस्वरो-१, दिनांक ३१ मार्च, २०१७ अन्वये महामंडळाचे भाग भांडवल रु. ४०० कोटीपर्यंत वाढविण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. सन २०१८ ते आजपर्यंत महामंडळाला रु. ३३७.०० कोटीचा निधी प्राप्त झालेला होता.

**१) गट प्रकल्प कर्ज योजना**

महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे शासन निर्णय क्र. अपाम २००५/प्र.क्र. ९७/प्रशा-१, दिनांक ६ ऑक्टोबर, २००६ अन्वये गट कर्ज योजना राबविण्यासाठी सुरुवात झाली. गट कर्ज योजनेअंतर्गत स्वयंसहाय्य बचत गटांना नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थामार्फत कर्ज उपलब्ध करुन दिले जात होते व त्या कर्जाची वसुली त्याच स्वयंसेवी संस्थेमार्फत केली जात होती. बचत गटांना स्वयंसेवी संस्थेमार्फत बचतीच्या १० पट किंवा रु. १५ लाखापर्यंतचे यापैकी जे कमी असेल ते कर्ज म्हणून देण्यात येत होते.

टीप : शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र. १८९/रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ अन्वये सदर योजनांचे नवीन अर्ज १ डिसेंबर, २०१७ पासून स्विकारणे बंद करुन नवीन तीन सुधारित योजना राबविण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार या सुधारित योजनांची अंमलबजावणी दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ पासून www.udyog.mahaswayam.gov.in या वेबप्रणालीद्वारे पुर्णपणे ऑनलाईन स्वरुपात सुरु करण्यात आली आहे.

**१. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-I)**

बँकेने रु. १५.०० लाखापर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत किंवा रु. ४.५ लाखाच्या मर्यादेत) त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते.

**२. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II)**

बँक कर्ज मर्यादा प्रती गटास जास्तीत जास्त रु. ५० लाखापर्यंतच्या देण्यात आलेलया उद्योग उभारणी कर्जावर ५ वर्षांपर्यंत जास्तीत जास्त १२ टक्के व्याजाने आणि रु. १५.०० लाखाच्या मर्यादेत व्याज परतावा त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल.

**३. गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I)**

महामंडळामार्फत सदर योजनेअंतर्गत, कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत असलेल्या पात्र शेतकरी उत्पादक (FPO) गटांना (Farmers Producers Organization-FPO), कंपनी कायदा, २०१३ अन्वये स्थापन झालेले) रु. १०.०० लाखापर्यंत बीनव्याजी दराने कर्ज रक्कम उद्योगाकरिता देण्यात येईल.

मात्र सदर योजनेअंतर्गत लाभार्थी गटांची कर्जाची परतफेड करण्या करीता असलेली उदासिनता पाहून, सदर योजना दि. १० जाने, २०२२ रोजीच्या मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आली आहे.

**महामंडळाच्या नवीन योजनांची सद्यस्थिती :**

**१. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-I)**

| वर्ष | पात्रता प्रमाणपत्र धारक लाभार्थी | बँकेमार्फत वाटप | | महामंडळामार्फत करण्यात आलेला व्याज परतावा | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेने मंजूर केलेली लाभार्थी संख्या | बँकेने वाटप केलेली रक्कम | व्याज परतावा करण्यात आलेली लाभार्थी संख्या | व्याज परतावा केलेली रक्कम |
| २०२१-२२ पर्यंत | ७९१७० | ३७७८२ | २४३८ कोटी | २६५६२ | १८६ कोटी |
| २०२२-२३ | २५७७० | १४६२५ | ११४६.२२ कोटी | १३५४६ | १५५.४० कोटी |

**२. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II)**

| वर्ष | पात्रता प्रमाणपत्र धारक लाभार्थी | बँकेमार्फत वाटप | | महामंडळामार्फत करण्यात आलेला व्याज परतावा | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेने मंजूर केलेली लाभार्थी संख्या | व्याज परतावा करण्यात आलेले लाभार्थी संख्या | व्याज परतावा करण्यात आलेली लाभार्थी संख्या | व्याज परतावा केलेली रक्कम |
| २०२१-२२ पर्यंत | ३९९ | २३७ | ७०५८ कोटी | ७७ | १.३५ कोटी |
| २०२२-२३ | १९८ | १०४ | ३२.२० कोटी | १४३ | ३.८१ कोटी |

**३. गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I)**

| वर्ष | महामंडळाकडे दाखल झालेली प्रकरणे | महामंडळाने केलेले वाटप | |
|---|---|---|---|
| | | मंजूर केलेले कर्ज प्रकरणे | वाटप केलेली कर्ज रक्कम |
| २०२१-२२ पर्यंत | ४५ | ३४ | ३.३० कोटी |
| २०२२-२३ | .. | १ | ५ लाख |

**९. शाश्वत विकास ध्येय (Sustainable Development Goals)**

संयुक्त राष्ट्राने सन २०१५ मध्ये शाश्वत विकास ध्येये (SDGs) स्वीकारली आहेत ज्यामध्ये १७ ध्येये आणि १६९ लक्ष्ये असून ती दि. १-१-२०१६ पासून लागू झाली आहेत. ही शाश्वत विकास ध्येये विकासाच्या सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय या तीन आयामांना संबोधित करतात. भारत संयुक्त राष्ट्रांच्या ठरावावर स्वाक्षरी करणारा देश असून शाश्वत विकास ध्येयांच्या अंमलबजावणीसाठी वचनबध्द आहे. नीति आयोग देशातील शाश्वत विकास ध्येयांच्या अंमलबजावणीसाठी आणि संबंधित धोरणात्मक समस्यांसाठी सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेश यांचेशी समन्वय साधत आहे. केंद्र शासनाचे सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (MoSPI) शाश्वत विकास ध्येयांचे निरीक्षण करण्यासाठी राष्ट्रीय निर्देशक आराखडा (National Indicator Framework) तयार करण्यासाठी जबाबदार आहे.

राज्यात शाश्वत विकास ध्येयांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी नियोजन विभाग समन्वयाचे काम करीत असून अर्थ आणि सांख्यिकी संचालकांना राज्याच्या शाश्वत विकास ध्येये आणि व्हिजन डॉक्युमेंटसाठी समन्वय अधिकारी म्हणून घोषित केले आहे. शाश्वत विकास ध्येये आणि त्यांचे लक्ष्ये लक्षात घेऊन नियोजन विभागाने त्या त्या निर्देशांकाशी संबंधित समन्वय विभाग आणि सहाय्यक विभाग निवडले आहेत. नियोजन विभागाने शाश्वत विकास ध्येये विचारात घेऊन राज्याचे VISION २०३० तयार केले असून सन २०१७ मध्ये ते नीती आयोगाला सादर केले आहे.

राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय योजनांची शाश्वत विकास ध्येयांशी सांगड घातली आहे. शाश्वत विकास ध्येयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजन विभागांतर्गत "शाश्वत विकास ध्येय-अंमलबजावणी आणि समन्वय केंद्र (SDG-ICC)" याची स्थापना करण्यात आली आहे.

**१०. राज्याचे व्हीजन २०३० (VISION २०३०)**

राज्यातील नागरिक सुदृढ, सुशिक्षित, आनंदी व सक्षम होऊन त्यांचे जीवनमान समृध्द होण्याचे उद्दिष्ट समोर ठेवत, पर्यावरण संवर्धन, संतुलित आर्थिक वृध्दी करण्याबरोबरच शाश्वत मानव विकास साध्य करण्याच्या दृष्टीने जे धोरण अवलंबून सन २०३० पर्यंत त्याची फलश्रुती साध्य करण्याचा कार्यक्रम म्हणजे राज्याचे "व्हीजन २०३०" होय. राज्याचा सांप्रतचा ९.४% असलेला आर्थिक वृध्दीदर सातत्याने वृध्दींगत करत सन २०३० पर्यंत तो १२% इतका करण्याचे तसेच **"राज्याचे भौगोलिक क्षेत्रातील वनाच्छादन"** क्षेत्रात सध्याच्या २०% वरुन ३३% इतकी करणे वाढ करणेचे योजले आहे. शाश्वत, समप्रमाणित व संतुलित आर्थिक वृध्दी साध्य करण्यासाठी (१) कृषि व संलग्न कार्ये, (२) उद्योग व सेवा, (३) पायाभूत सुविधा, (४) सामाजिक क्षेत्र, (५) प्रशासन ही पाच विकासक्षेत्रे (Development Sectors) आधारस्तंभ म्हणून विचारात घेण्यात आली असून यांच्या सर्वांगीण विकासाची ध्येये सुनिश्चित करुन अनुषंगिक उपाययोजनांचा सर्वंकष आराखडा करण्यात आला आहे.

कृषि क्षेत्राचा आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शाश्वत विकास, तसेच उपलब्ध जलसंपदेचाही शाश्वत विकास, उपलब्ध जलसाठ्यांचा सुनियोजित वापर, वृक्ष लागवड, सिंचन क्षमता वर्धन, जलस्त्रोत विकास, इ. मधून "हरीत महाराष्ट्र" हे ध्येय साधणे. उद्योग व सेवा सेवाक्षेत्र वाढीसाठी "मेक इन महाराष्ट्र" संकल्पनेतून रोजगार निर्मितीच्या संधी निर्माण करुन उत्पन्न

वाढविणे यावर भर देण्यात येत आहे. ऊर्जा निर्मिती स्त्रोत वृध्दी, सुरक्षित आरामदायी दळणवळणासाठी पायाभूत सुविधा सक्षम करणे, त्यातून ग्रामीण -शहरी वाहतूकीचे, संपर्काचे जाळे सक्षम करणे, राज्यातील नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती यात अधिक प्रभावीपणे कार्यरत होऊन दारिद्र्य निर्मूलन, वंचितांना सामाजिक संरक्षण, याबाबत सामाजिक सजगता साधण्यासाठी ध्येये सुनिश्चित करण्यात आली आहेत. या अनुषंगाने निधी व्यवस्थापन केंद्र पुरस्कृत योजना व राज्य योजनांच्या माध्यमातून करण्याचे सुचीत करण्यात आले असून याचा आढावा विभाग स्तरावर नियोजन विभागाकडून घेण्यात येत आहे.

**११. सिंधुरत्न समृद्ध योजना**

राज्यातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी हे जिल्हे वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थिती, उच्च पर्जन्यमान, मनमोहक समुद्रकिनारा व नैसर्गिक संपत्तीचे वरदान लाभलेले जिल्हे आहेत. या जिल्ह्यातील लोकसंख्येचा सामाजिक दृष्टिकोनातून विचार करता या दोन्ही जिल्ह्यांना आदिवासी घटक उपयोजनेतून अथवा अनुसूचित जाती घटक उपयोजनेतून अत्यंत अल्प प्रमाणात निधी उपलब्ध होतो. त्याचप्रमाणे राज्यातील विविध जिल्ह्यातील निवडक तालुक्यांत मानव विकास कार्यक्रम राबविण्यात येतो, त्यापैकी सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यातील केवळ वैभववाडी या एकाच तालुक्याचा मानव विकास कार्यक्रमांतर्गत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या कार्यक्रमामधून देखील दोन्ही जिल्ह्यांना पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध होत नाही. या अनुषंगाने "सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यामध्ये नैसर्गिक साधनसामुग्रीवर आधारित पर्यटन, मत्स्यव्यवसाय व सूक्ष्म उद्योगांचा विकास करण्यासाठी "सिंधुरत्न समृद्ध" ही पथदर्शी योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यातील कृषि, फलोत्पादन, पशुधन विकास, मत्स्यव्यवसाय, पर्यटन, ग्रामविकास, लहान बंदरांचा विकास, नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारित सूक्ष्म उद्योग, कौशल्य विकास अशा जिल्ह्यातील सर्व योजना/कार्यक्रमांची सांगड घालून जिल्ह्याच्या विकासाचे मॉडेल तयार करून राबविण्यात येणार आहे.

२. सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमधील नैसर्गिक साधनसंपत्तीचे परिणामकारक नियोजन करून या जिल्ह्यांचा सर्वकष विकास करण्याच्या दृष्टीने सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांसाठी "सिंधुरत्न समृद्ध" ही पथदर्शी योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या ३ वर्षासाठी राबविण्यात येत आहे. "सिंधुरत्न समृद्ध" योजनेअंतर्गत सर्वसाधारणपणे खालील विकासक्षेत्रांची निवड करण्यात येत असून या विकासक्षेत्रांचे आराखडे तयार करून त्याअनुषंगिक विविध कामे/योजना तयार करून सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यात राबविण्यात येतील.

१) कृषि, फलोत्पादन व संलग्न सेवा
२) पशुधन विकास व दुग्धव्यवसाय
३) मत्स्यव्यवसाय
४) पर्यटन विकास
५) सुक्ष्म उद्योग, रेशीम उद्योग व खनिजे
६) वने व वनोत्पादन
(७) औषधी वनस्पती
८) पर्यावरण
९) लघुपाटबंधारे, जलसंधारण
१०) ग्राम विकास
११) कौशल्य विकास
१२) लहान बंदरांचे बांधकाम

"सिंधुरत्न समृद्ध" योजनेची प्रमुख्य उद्दिष्ट्ये :-

(१) सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती व विकास क्षेत्रांची निवड करून त्या क्षेत्रांचा "सूक्ष्म आराखडा" तयार करणे व त्या आधारे परिणामकारक अंमलबजावणी करून पर्यावरणक्षम शाश्वत विकास घडविणे.

(२) सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यातील तरूण उद्योजकांना स्थानिक स्तरावर "नवीन उद्योगधंदे" विकसित करण्यासाठी उपाययोजनाद्वारे प्रोत्साहित करणे.

(३) सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व दारिद्र्य रेषेखालील लाभार्थीसाठी व्यक्तिगत दरडोईउत्पन्न वाढीकरीता अतिरिक्त "आर्थिक मदत" उपलब्ध करणे.

## (ब) विभागाचे अतिरिक्त कार्यक्रम

### १) तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम :

**(i) श्रीक्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व पालखीतळ येथे नागरी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे :** संतश्रेष्ठ तुकाराम महाराज जन्म चतु:शताब्दी निमित्त श्रीक्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व पालखीतळ विकासाचा रु. १४२७.८५ कोटीचा सुधारित विकासाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये शासनाचा सहभाग रु. १३०४.०० कोटीचा आहे. सन २०२२-२३ साठी रु. १४५.०९ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ करिता रु. १००.०० कोटी निधी प्रस्तावित आहे.

**(ii) शेगाव विकास कार्यक्रम :** श्री संत गजानन महाराज समाधी जन्मशताब्दी निमित्त शेगाव येथील भाविकांसाठी मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी रु. ५३९.९६ कोटीचा सुधारीत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये शासनाचा सहभाग ४२९.५६ कोटीचा आहे. सन २०२२-२३ साठी रु. १०.४५२८ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ करीता रु. ०.८३ कोटी निधी प्रस्तावित आहे.

**(iii) संत तुकडोजी महाराज जन्मस्थळी नागरी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशतब्दी निमित्त श्रीक्षेत्र मोझरी, जिल्हा अमरावती येथील मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी रु. १५०.८३ कोटीचा सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२२-२३ साठी रु. ६.७१ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ करीता रु. २.४६ कोटी इतका निधी प्रस्तावित आहे.

**(iv) वलगांव, ता. व जि. अमरावती येथे संत गाडगेबाबा निर्वाणभूमी विकास आराखडा :** वलगांव, ता. व जि. अमरावती येथे संत गाडगेबाबा निर्वाणभूमी विकासासाठी रु. ३७.८७ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२२-२३ साठी रु. ३.५३ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ करीता रु. १.३२ कोटी निधी प्रस्तावित आहे.

**(v) श्रीक्षेत्र कौंडण्यपूर, ता. तिवसा, जि. अमरावती येथे नागरी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे :** श्रीक्षेत्र कौंडण्यपूर, ता. तिवसा, जि. अमरावती येथे नागरी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी रु. २०.०० कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२२-२३ साठी रु. २.८६ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ करीता रु. ०.५ कोटी निधी प्रस्तावित आहे.

**vi) सेवाग्राम, जि. वर्धा विकास आराखडा :** वर्धा येथील महात्मा गांधी यांच्या सेवाग्राम आश्रमास ७५ वर्षे पूर्ण झाली असून आश्रमाचे ऐतिहासिक महत्त्व विचारात घेऊन तेथे देश-विदेशातून येणाऱ्या विद्यार्थी व पर्यटक यांच्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र व पायाभूत सेवा सुविधाकरिता रु. १६२.५२ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात रु. ४५.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी रु. ५०.१७८३ कोटी निधी प्रस्तावित आहे.

**(vii) श्रीक्षेत्र भिमाशंकर तिर्थक्षेत्र विकास आराखडा जिल्हा पुणे :** श्रीक्षेत्र भिमाशंकर, तिर्थक्षेत्र विकास आराखडा जिल्हा पुणे हे बारा ज्योतिर्लिंगापैकी महत्त्वाचे सहावे ज्योतिर्लिंग आहे. येथे येणाऱ्या पर्यटक व भाविकांना सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने रु. १४८.३७ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यासाठी सन २०२२-२३ मध्ये रु. ४०.०० कोटी निधीची तरतुद करण्यात आली असून सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी रु. ३४.५७३५ कोटी निधी प्रस्तावित आहे.

**(viii) श्रीक्षेत्र घृष्णेश्वर, वेरुळ, तालुका खुलताबाद, जि. छत्रपती संभाजी नगर आराखडा :** श्रीक्षेत्र घृष्णेश्वर, वेरुळ, तालुका खुलताबाद, जि. छत्रपती संभाजी नगर हे भारतातील १२ ज्योतिर्लिंगापैकी एक महत्त्वाचे ज्योतिर्लिंग आहे. या तिर्थक्षेत्रास भेट देणाऱ्या पर्यटक व भाविकांना सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने रु. ११२.४१ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२२-२३ मध्ये रु. ३५.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी रु. २७.५ कोटी निधी प्रस्तावित आहे.

**(ix) श्रीक्षेत्र गणपतीपुळे तीर्थक्षेत्र, तालुका-जिल्हा रत्नागिरी विकास आराखडा :** श्रीक्षेत्र गणपतीपुळे तीर्थक्षेत्र, तालुका-जिल्हा रत्नागिरीच्या विकासाकरिता रु. १०२.२९ कोटीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सन २०२२-२३ साठी रु. ५१.२० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सन २०२३-२४ करीता रु. ४७.२९ कोटी निधी प्रस्तावित आहे.

**(x) श्रीक्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडा :** नियोजन विभागामार्फत "श्रीक्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडा" हा विकास आराखडा राबविण्यात येणार आहे. हा आराखडा राबविण्याबाबतची कार्यवाही नियोजन विभागाकडून सुरू असून याकरिता आर्थिक वर्ष सन २०२३-२४ करिता रु. ५०.० कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**(xi) स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर, ता. हवेली व समाधी स्थळ स्मारक वढु (बु.) ता. शिरूर, जिल्हा पुणे विकास आराखडा :** नियोजन विभागामार्फत "स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर, ता. हवेली व समाधी स्थळ स्मारक वढु (बु.) ता. शिरूर, जिल्हा पुणे विकास आराखडा" हा विकास आराखडा राबविण्यात येणार आहे. हा आराखडा राबविण्याबाबतची कार्यवाही नियोजन विभागाकडून सुरू असून याकरिता आर्थिक वर्ष सन २०२३-२४ करिता रु. १००.० कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**(xii) अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार करणे :** नियोजन विभागामार्फत "अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार करणे" हा विकास आराखडा राबविण्याबाबतची कार्यवाही नियोजन विभागाकडून सुरू आहे.

**(xiii) वाढा, जि. चंद्रपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील विकास आराखडा :** नियोजन विभागामार्फत "वाढा, जि. चंद्रपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील विकास आराखडा" राबविण्याबाबतची कार्यवाही नियोजन विभागाकडून सुरू आहे.

**(xiv) लोणार सरोवर विकास आराखडा :** मा. उच्च न्यायालयाच्या दि. १५-०६-२०२२ रोजीच्या आदेशास अनुसरून, महसूल व वन विभागाच्या दि. २७-०७-२०२२ रोजीच्या आदेशान्वये लोणार सरोवरचे संरक्षण संवर्धन व जतन करण्यासाठी विविध विभागाच्या माध्यमातून करावयाच्या कामाचा अंदाजित रु. ३६९७८.७७ लक्ष रकमेच्या "लोणार सरोवर विकास आराखड्या"स मान्यता देण्यात आली आहे. लोणार सरोवर विकास आराखड्याअंतर्गत समाविष्ट मंजुर कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याकरिता विविध विभागांतर्गत कामे सोपविण्यात आलेली आहेत. नियोजन विभागाकडे दर्शविण्यात आलेली कामे पूर्ण करण्याकरिता आर्थिक वर्ष सन २०२३-२४ करिता रु. ५०.० कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**(xv) ताजबाग, जि. नागपूर विकास आराखडा :** नागपूर शहरात असलेला हजरत बाबा ताजुद्दीन यांचा ताजबाग येथील दर्गा देश विदेशातील भाविकांचे श्रध्दास्थान आहे. या परिसराचा विकास व सौंदर्यीकरण करण्यासाठी दि. ३० सप्टेंबर २०१३ च्या शासन निर्णयान्वये रु. १३२.४९ कोटीच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी रु. १४.०८/- कोटी तरतूद करण्यात आली आहे. सन २०२३-२४ करीता रु. ७.०८ कोटी इतका निधी प्रस्तावित आहे.

## २. मानव विकास कार्यक्रम :

शासनाने सन २०११-१२ पासून मानव विकास ही संकल्पना जिल्ह्याऐवजी 'तालुका' हा महत्वाचा घटक मानून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने "मानव विकास कार्यक्रम" अंतर्गत सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील "स्त्री साक्षरतेचे प्रमाण" व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार "ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण" या दोन निर्देशांकांच्या आधारे राज्यातील २३ जिल्ह्यातील १२५ अति मागास तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०११-१२ पासून दरडोई उत्पन्न वाढविणे, आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण इ. विषयीच्या नियमित योजना व जिल्हा तालुका स्पेसिफिक योजना या १२५ तालुक्यांत राबविण्यात येत आहेत. मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने सन २०१२-१३ या वर्षापासून हा कार्यक्रम निवडलेल्या १२५ तालुक्यातील ४३ 'क' वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन २०२२-२३ या वर्षासाठी सर्वसाधारण योजनेतून रु. ९६६.५७ कोटी तर अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत रु. ३.०० कोटी अशा प्रकारे एकूण रु. ९६९.५७ कोटीचा नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. तसेच सन २०२३-२४ या वर्षासाठी सर्वसाधारण योजनेकरीता रु. ५००.०० कोटी तर अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत रु. ३.०० कोटीचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

## ३. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना :

"खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना" या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत मा. संसद सदस्यांना त्यांच्या मतदार संघातील विकास कामे करण्यासाठी केंद्र शासनाकडून सन १९९३-९४ मध्ये प्रत्येकी रु. ५.०० लक्ष व १९९४-९५ ते १९९७-९८ पर्यंत रुपये १.०० कोटी या प्रमाणात निधी दिला जात होता. तसेच १९९८-९९ पासून सन २०१०-११ या आर्थिक वर्षापर्यंत रु. २.०० कोटी इतका निधी दिला जात होता. सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून संसद सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या निधीमध्ये वाढ करण्यात येऊन प्रत्येक संसद सदस्यांस प्रति आर्थिक वर्षाकरिता रु. ५.०० कोटी इतका निधी देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने निश्चित केलेली मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन ही योजना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राबविली जाते. या योजनेंतर्गत संसद सदस्यांना अनुज्ञेय असलेला निधी केंद्र शासन ECS द्वारे परस्पर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात येतो. जिल्हाधिकारी हा निधी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतंत्र बचत खाते उघडून त्यामध्ये ठेवतात. या कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण केंद्र शासनाच्या स्तरावर सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत करण्यात येत असून जून, २०१६ पासून या कार्यक्रमाची सुधारित मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यात आली आहेत. राज्य स्तरावर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी राज्य नोडल विभाग म्हणून नियोजन विभागाची आहे.

## ४. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम :

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याच्या गरजांवर आधारित लोकोपयोगी लहान स्वरुपाची कामे घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी विशेष तरतूद सन १९८३-८४ पासून करण्यात येत होती. सन १९८८-८९ पासून ही तरतूद विधानसभा मतदारसंघ निहाय करण्यात आली. सदर विशेष तरतूद सन १९९४-९५ पर्यंत नियमित योजना नियतव्ययाच्या व्यतिरिक्त होती. सन १९९४-९५ या आर्थिक वर्षामध्ये प्रथमच विधान परिषद सदस्यांसाठीही तरतूद करण्यात आली. सन १९९५-९६ पासून हा कार्यक्रम जिल्हा नियोजन समित्यांच्या अखत्यारित आणला होता व त्यासाठीची तरतूद जिल्हा योजनेसाठी उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यात आली. तथापि, १९९९-२००० पासून या योजनेचा समावेश राज्यस्तर योजना म्हणून करण्यात आला. तसेच सन २००४-०५ या वर्षापासून आदिवासी मतदारसंघासाठीच्या निधीची तरतूद बिगर आदिवासी योजनेतून करण्यात येत असून सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या घटकांसाठी १०% निधी राखून ठेवण्याची तरतूद या कार्यक्रमांतर्गत करण्यात येते. सन २००६-०७ या वर्षापासून सर्व विधानपरिषद सदस्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील (कार्यक्षेत्र नसल्यास राज्यातील) कोणताही एक जिल्हा नोडल जिल्हा म्हणून घोषित करणे आवश्यक करण्यात आले आहे. विधानपरिषद सदस्यांना आर्थिक वर्षाकरिता अनुज्ञेय असलेला संपूर्ण निधी शासन स्तरावरुन या नोडल जिल्ह्यास सुपूर्द केला जातो व तद्नंतर विधानपरिषद सदस्यांच्या शिफारशीनुसार या निधीचे पुढील वितरण त्या नोडल जिल्ह्यामार्फत केले जाते. विधानपरिषद सदस्याला त्यांच्या आर्थिक वर्षातील कार्य-कालानुसार त्याप्रमाणात निधी अनुज्ञेय आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून सर्व विधानमंडळ सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या निधीमध्ये वाढ करण्यात येऊन, सदरचा निधी प्रति आर्थिकवर्षी प्रति विधानमंडळ सदस्य रु. २००.०० लक्ष करण्यात आला होता.

तथापि, सदर निधीमध्ये वाढ करून सन २०२०-२१ या वर्षामध्ये प्रति विधानमंडळ सदस्य रु. ३०० लक्ष व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून प्रति विधानमंडळ सदस्य रु. ४०० लक्ष आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून रु. ५००.०० लक्ष याप्रमाणे निधी अनुज्ञेय करण्यात आला आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता रु. ४००.०० लक्ष याप्रमाणे एकूण ३६७ विधीमंडळ सदस्यांचा रु. १४६८.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. तसेच विधानमंडळ सदस्यांना वाढीव रु. १.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच पावसाळी अधिवेशनात रु. २६७.४२ कोटी एवढ्या रकमेची पूरक मागणी मंजूर करण्यात आली आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता एकूण रु. २६००.०० कोटी एवढी तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सर्वसमावेशक मार्गदर्शन सूचना शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र. ९६/का १४८२, दि. १२ जुलै, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आला असून तद्नंतर काळानुरूप व लोकप्रतिनिधींच्या मागण्या विचारात घेऊन वेळोवेळी सदर सूचनांमध्ये बदल करण्यात आले आहेत.

### ५. राज्य माहिती संचयिका :

धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी विश्वासार्ह व वेळेवर माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य माहिती संचयिका (State Data Bank) (https:/ mahasdb. maharashtra.gov.in) निर्माण करण्यात आली असून दिनांक १ मे, २०१४ पासून कार्यान्वित झाली आहे. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक रामासं-२०१३/प्र.क्र.२२७/का.१४१७, दिनांक ७/६/२०१४ नुसार दिनांक १-८-२०१४ पासून धोरणात्मक व प्रशासकीय बाबींकरीता राज्य माहिती संचयिकेवरील माहितीच फक्त अधिकृत समजण्यात येणार असल्याबाबत शासनाने घोषित केले आहे. राज्य माहिती संचयिकेत विविध विभागांच्या माहिती समावेशनासाठी त्यांच्या ई-गव्हर्नन्स/संगणकीकरण प्रकल्पातील माहिती इलेक्ट्रॉनिक पध्दतीने समाविष्ट करण्यात येत असून, आवश्यकतेनुसार माहिती नोंदणी प्रणाली विकसित करण्यात येत आहे. राज्य माहिती संचयिका अद्ययावतीकरणाचे काम सातत्याने सुरू राहणार असून माहिती संचाची त्यात भर पडणार आहे.

सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८ (सन २००९ चा ७) च्या कलम ३३ खाली तयार करण्यात आलेल्या सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २०११ मधील नियम ३, उपनियम (२) अनुसार प्रदान केलेल्या शक्तीनुसार महाराष्ट्र शासनाने या नियमांखाली अधिकार व कर्तव्ये बजावण्याकरिता संचालक, अर्थव सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना "नोडल ऑफिसर" म्हणून घोषित केले आहे.

### ६. नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती दल :

नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर व भंडारा या चार जिल्ह्यांच्या जिल्हा समन्वय समितीस नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक नविका-१००९/प्र.क्र. ६८/का-१४१५ दिनांक १७ डिसेंबर, २००९ अन्वये गावभेट योजनेअंतर्गत प्रतिवर्षी प्रती जिल्हा रुपये ३ कोटी प्रमाणे एकूण रुपये १२.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात येतो.

नक्षलग्रस्त क्षेत्रातील नक्षलवाद्यांना गावबंदी केलेल्या गावांना प्रत्येकी रुपये ६ लाख एवढा निधी त्या गावांच्या विकासात्मक कामासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान म्हणून गृह विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एनएएक्स-०४१८/ प्र.क्र.१६९/विशा-१ब दिनांक १ डिसेंबर, २०१८ अन्वये मंजूर करण्यात येतो.

### ७. राज्यस्तरीय बँकर्स समिती :

विविध शासकीय विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकामार्फत वित्त सहाय्य / कर्ज उपलब्ध करण्याबाबत असलेल्या तरतूदीस अनुसरुन बँकांकडून होणाऱ्या कर्ज पुरवठ्यासंदर्भात राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात येते. त्या अनुषंगाने राज्य शासन व राज्यातील राष्ट्रीयकृत बँकांचा फोरम यामधील दुवा या अर्थाने नियोजन विभाग नोडल विभाग आहे.

### ८. प्रादेशिक ग्रामीण बँकांना भाग भांडवल देणे :

ग्रामीण भागातील लहान व मध्यम शेतकरी, कृषी क्षेत्रातील कामगार वर्ग आणि लहान उद्योग इत्यादिंना कृषी, व्यापार, वाणिज्य, उद्योग आणि इतर सुविधा मिळून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास व्हावा यासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांची निर्मिती, नियंत्रण आणि समापन करणे या उद्देशाने प्रादेशिक ग्रामीण बँका अध्यादेश १९७५ लागू करण्यात आला व सन १९७६ मध्ये सदर अध्यादेश अधिनियमात रुपांतरीत झाला. प्रादेशिक ग्रामीण बँकांचे ध्येय हे सहकारी बँकाकडे असलेले स्थानिक ज्ञान आणि ग्रामीण भागातील प्रश्नांशी असलेला परिचितपणा व वाणिज्यिक बँकांकडील व्यावसायिकपणा, ठेवीची चलनशीलता, आधुनिक दृष्टी या दोन्हींचा मिलाप करणे हे होते.

या बँकांना पुन:पुंजीकरणासाठी "ग्रामीण बँकांना भागभांडवल देणे" या योजनेमधून अर्थसहाय्य देण्यात येते. यामध्ये केंद्रशासनाचा ५० टक्के हिस्सा, प्रवर्तक बँकांचा ३५ टक्के हिस्सा व महाराष्ट्र शासनाचा १५ टक्के हिस्सा आहे.

१. महाराष्ट्र राज्यात सध्या महाराष्ट्र ग्रामीण बँक, विदर्भ कोकण ग्रामीण बँक या दोन प्रादेशिका बँका कार्यरत असून सदर बँकाची मुख्यालये अनुक्रमे औरंगाबाद व नागपूर येथे आहेत. अनुक्रमे बँक ऑफ महाराष्ट्र व बँक ऑफ इंडीया या दोन बँका पुरस्कर्त्या बँका आहेत. प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या संचालक मंडळावर राज्य शासनाचे प्रतिनिधी कार्यरत असून अशा नियुक्त प्रतिनिधींचा कार्यकाल हा कार्यभार स्वीकारल्यापासून तीन वर्षाचा असतो.

२. सन २०१२-१३ अखेर राज्य शासनाच्या १५% हिश्श्याची रु. २४.१५ कोटी इतकी रक्कम पुनर्भांडवलीकरणाबाबत केंद्र शासनाच्या व नाबार्डच्या निदेशानुसार प्रादेशिक ग्रामीण बँकांना वितरित करण्यात आली आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रु. ११.७७ कोटी इतकी रक्कम व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रु. ४६.०० कोटी इतकी रक्कम प्रादेशिक ग्रामीण बँकांना वितरित करण्यात आली. सन २०२२-२३ करीता मागणी क्रमांक ओ-१२ ग्रामीण बँकांना भाग भांडवल देणे (सीआरसी सांकेतांक ५४६५००१९) या योजनेसाठी रु. ८५.३१२० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित असून हा निधी प्रादेशिक ग्रामीण बँकांना सन २०२१-२२ या वर्षाचा देय निधी आहे.

सन २०२३-२४ करिता रु. ३६.८३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

### ९. केंद्र व राज्य शासनाच्या बँकिंगशी निगडीत योजनांचा प्रचार, प्रसिध्दी व समन्वय :

महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ च्या शासन निर्णयान्वये केंद्र व राज्य शासनाच्या बँकीगशी निगडीत योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय याकरीता जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ४) | जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी | सदस्य |
| ५) | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी | सदस्य |
| ६) | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ७) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र विशेष निमंत्रित | सदस्य |
| ८) | सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता | सदस्य |
| ९) | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| १०) | जिल्हा व्यवस्थापक, राज्यशासनाचे मागासवर्ग विकास महामंडळ | निमंत्रित |
| ११) | सहायक प्रबंधक, नाबार्ड | सदस्य |
| १२) | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी | सदस्य |
| १३) | जिल्ह्यातील प्रमुख बँकांचे समन्वयक अधिकारी | निमंत्रित |
| १४) | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य सचिव |

या समितीस "केंद्र व राज्य शासनाच्या बँकींगशी निगडीत योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय" या योजनेंतर्गत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून निर्गमित शासन निर्णय/परीपत्रकाप्रमाणे प्रचार व प्रसिध्दीचे कामे हाती घेता येतील. सन २०२२-२३ करीता केंद्र व राज्य शासनाच्या बँकींगशी निगडीत योजनांचा प्रचार, प्रसार व समन्वय (कार्यक्रम) (सीआरसी संकेतांक ३४५१ ए००१) अंतर्गत रु. ६०.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

**१०. शासनाद्वारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रिया :-** शासनाद्वारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत असून जेणेकरून लाभार्थ्यांना योजनांचा पूर्णपणे लाभ मिळेल आणि अनावश्यक गोष्टी टळू शकतील. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे अशा विविध कल्याणकारी योजनांमधून मिळणारे लाभ हे थेट लाभार्थ्यांनाच त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान त्यांच्या आधार जोडणी झालेल्या बँक खात्यामध्ये देण्याबाबत शासनाने नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१६/प्र.क्र. १३३/का. १४१७, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ व ३ मार्च, २०१७ अन्वये मान्यता दिली आहे. सदर निर्णयामुळे लाभार्थ्याला आवश्यक असणाऱ्या वस्तुंची गुणवत्ता तपासून व भाव करून चांगली वस्तू खरेदी करता येईल अशी वस्तू स्थानिक पातळीवरच लाभार्थी खरेदी करणार असल्याने स्थानिक उद्योग व्यावसायिकांना लाभ होईल. रोख रकमेच्या स्वरुपात लाभ वाटप केल्यामुळे शासनाच्या कार्यपद्धतीत अधिक पारदर्शकता येईल व संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ झालेली दिसून येते.

**११. आकांक्षित जिल्हा कार्यक्रम (Aspirational District Programme) :**

केंद्र शासनाने देशातील ११२ जिल्ह्यांचा झपाट्याने कायापालट करण्यासाठी जानेवारी, २०१८ मध्ये "आकांक्षित जिल्हा कार्यक्रम" सुरू केला आहे. या जिल्ह्यांची निवड पारदर्शक प्रक्रियेतून करण्यात आली आहे. दुर्गमता आणि त्यांच्यासमोरील आव्हानांमुळे, विशेषत: आरोग्य आणि पोषण, शिक्षण, कृषि आणि जलसंपदा, कौशल्य विकास आणि आर्थिक समावेशन आणि पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रातील प्रगती या जिल्ह्यांमध्ये तुलनेने कमी होती. नवीन भारत-२०२२ च्या सर्वसमावेशक विकासासाठी, विकास प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी या जिल्ह्यांमध्ये जलद प्रगती आवश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील नंदूरबार, धाराशिव, वाशिम व गडचिरोली या जिल्ह्यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत आरोग्य आणि पोषण (३०%), शिक्षण (३०%), कृषि आणि जलसंपदा (२०%), कौशल्य विकास आणि आर्थिक समावेशन (१०%) आणि मुलभूत पायाभूत सुविधा (१०%) या पाच क्षेत्रांमधील ४९ प्रमुख कामगिरी निर्देशकांमधील (Key Performance Indicators) कामगिरीच्या आधारे जिल्ह्यांना गुणवत्ता क्रमांक देण्यात येतो. सन २०१८-१९ पासून राज्यातील आकांक्षित जिल्ह्यांना जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मिळणाऱ्या मूळ नियतव्ययाव्यतिरिक्त २५ टक्के अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**१२. रोजगार हमी योजना :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना असून महाराष्ट्राच्या ३४ जिल्ह्यांमध्ये सदर योजना सन २००८ पासून राबविण्यात येत आहे. योजनेचे प्रमुख उद्दिष्ट ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून देऊन कायम स्वरुपात टिकाऊ मालमत्ता निर्माण करणे हे आहे. योजनेत सार्वजनिक तसेच वैयक्तीक लाभाच्या योजनांचा समावेश असून, भारतीय राज्य घटनेच्या कलम ४१ नुसार नागरिकांच्या कामाच्या हक्काचे रक्षण करण्यात येते.

**१३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी १९७७ पासून महाराष्ट्रात सुरू झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार दोन योजना सुरू होत्या :-

(१) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना.

(२) वैयक्तिक लाभाच्या योजना.

सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासूनच रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती.

तद्नुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र विधानमंडळाने केंद्रीय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळविण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीत बदल झाला आहे.

सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सन २०१४ मध्ये बदल केल्याप्रमाणे) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरू आहेत :-

(अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रति व्यक्ती १०० दिवसांवरील मजुरांच्या मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

(ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम (७)(दहा) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्त्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

उदा. १) जवाहर/धडक सिंचन विहीर योजना

२) रोहयोंतर्गत फळबाग लागवड योजना

३) मातोश्री शेत/पाणंद रस्ते योजना

४) शरद पवार ग्राम समृध्दी योजना

५) सुविधा- संपन्न कुटूंब व समृद्धगाव योजना.

याशिवाय राज्य शासनाचा निधी पुढील बाबींकरिता वापरला जातो.

१) राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीपथावरील अपूर्ण (कुशल) कामे पूर्ण करण्याकरिता.

२) राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरिता.

३) मजुरी दरांतील वाढीव फरक.

४) योजनेंतर्गत होणाऱ्या कुशल भागावरील खर्चाच्या २५% खर्च.

५) शेत तेथे शेततळे ही (योजना योजनेत्तर) शासनाने सुरू केली असून या योजनेंतर्गत विविध आकारमानाची शेततळी अनुज्ञेय असून लाभार्थ्यास शेततळ्याच्या आकारमानानुसार अनुदान देय राहणार असून अनुदानाची कमाल मर्यादा रु. ५०,०००/- इतकी आहे.

६) क वर्ग नगरपालिकांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे सुरू करण्यात आली असून सूक्ष्म पाणलोट विकासावरही भर देण्यात आला आहे.

या योजनेचा खर्च व मनुष्यदिनी निर्मितीबाबतची गेल्या तीन वर्षांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

(मनुष्यदिन निर्मिती कोटीत)

| वर्ष | | खर्च (कोटी) | मनुष्यदिन निर्मिती (कोटी) |
|---|---|---|---|
| २०१९-२०२० | .. | १८२१.१४ | ६.३० |
| २०२०-२०२१ | .. | १९६९.२२ | ६.७९ |
| २०२१-२०२२ | .. | २४०९.५१ | ८.२५ |
| २०२२-२०२३ (दि. ०१/०३/२०२३ पर्यंत) | .. | २६४५.८१ | ७.१९ |

राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत दि. १ एप्रिल, २००८ रोजी एकूण १०१३५ कामे अपूर्ण होती. त्यापैकी दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत ९९८८ कामे पूर्ण झाली/वगळण्यात आली आहेत. दिनांक ३० जून, २०१५ रोजी १४७ कामे अपूर्ण होती. जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील दिनांक ३० जून, २०१५ रोजी जी अपूर्ण कामे शिल्लक आहेत, अशी कामे जुन्या रोजगार हमी योजनेशिवाय इतर योजनेतून पूर्ण करणेबाबत दिनांक १८ मे, २०१६ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार अशी कामे रोजगार हमी योजनेशिवाय इतर योजनेतून पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणा यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सध्या जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये अपूर्ण कामे सुरू नाहीत.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे उद्दिष्ट :** अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेंतर्गत १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असून, त्या माध्यमातून स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायत राज संस्थाचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे.

योजनेंतर्गत सार्वजनिक व वैयक्तिक लाभाची कामे घेता येतात. सार्वजनिक कामांपैकी प्रामुख्याने जलसंधारण व जलसंवर्धनाची कामे, दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासह), रस्त्याची कामे घेण्यात येतात. वैयक्तिक लाभाच्या कामांमध्ये अनुसूचित जाती/जमाती, दारिद्र्यरेषेखालील, भू-सुधार खालील व इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, लहान व सीमांत शेतकरी यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणारी कामे, फळबाग लागवड व भू-सुधार कामे, तसेच कृषी संदर्भातील कामे, पशुधन संदर्भातील कामे, मत्स्यव्यवसाय अनुषंगिक कामे, ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्यासंबंधी तसेच ग्रामीण स्वच्छतेसंबंधीत कामे घेण्यात येतात.

तसेच,

१) गावातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि स्मशानभूमी यांना जोडणारे प्रमुख तीन रस्त्यांची कामे करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

२) महिला व बाल विकास विभागाच्या ICDS या योजनेशी अभिसरण करून अंगणवाडी केंद्र इमारतीची बांधकामे करण्यात येणार आहेत.

३) मनरेगा अंतर्गत १०० दिवस मजुरी पूर्ण केलेल्या कुटुंबातील एका सदस्यास कौशल्यवृद्धीचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वत: सक्षम होणेच्या दृष्टीने ग्राम विकास विभागाच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांचे समवेत अभिसरणामार्फत Project LIFE-MGNREGA राबविण्याचे प्रस्तावित आहे.

४) रेशीम उद्योग विकासाची योजना रेशीम विभागाद्वारे संपूर्ण राज्यात तीन वर्षांसाठी राबविण्यात येत असून त्याअंतर्गत तुती लागवड कार्यक्रम तीन वर्षांसाठी घेण्यात आला आहे. तसेच या योजने अंतर्गत टसर, अर्जुन व ऐन रोपांची लागवड करण्यात येते.

५) जून, २०१५ ते जून, २०१८ या कालावधीत १ लक्ष सिंचन विहीरी पूर्ण करण्याचा कार्यक्रम घेतला आहे.

६) राज्यामध्ये महात्मा गांधी नरेगा योजना राबविताना अभिसरणातून कामे घेण्याबाबत तसेच मनरेगा योजना राबविण्याच्या स्वरुपामध्ये लक्षणीय बदल करण्याच्या अनुषंगाने राज्यामध्ये समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना राबविण्याबाबत शासन निर्णय दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून मनरेगा अंतर्गत अनुज्ञेय वैयक्तिक व सार्वजनिक लाभाची ११ कामे सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षामध्ये प्राधान्याने मोठ्या प्रमाणात घेण्यात येणार आहेत. यामध्ये अहिल्यादेवी सिंचन विहिरी, अमृतकुंड शेततळे, भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग, भू-संजीवनी नाडेप कंपोस्टिंग, कल्पवृक्ष फळबाग लागवड, निर्मल शौचालय, निर्मल शोषखडे, समृद्ध गाव तलाव, इतर समृद्ध जलसंधारणाची कामे, अंकुर रोपवाटिका, नंदनवन वृक्ष लागवड, संगोपन व संरक्षण, ग्राम सबलीकरणाची समृद्ध ग्राम योजना अशी ११ प्रामुख्याने कामे प्रत्येकी १,११,१११ प्रमाणे घेण्यात येणार आहेत. याद्वारे मनरेगा अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वैयक्तीक लाभाच्या कामांचा लाभ मिळणार असून, त्याद्वारे त्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होणार आहे. तसेच या सार्वजनिक लाभांच्या कामांमुळे ग्रामीण भागाचा विकास होणार आहे.

**फलोत्पादन योजना :** राज्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमाण जवळपास ८५ टक्के असल्याने या शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लक्षावधी अल्प आणि अत्यल्प भूधारकांच्या शेती पध्दतीत परिवर्तन घडवून आणून पावसाच्या लहरीपणामुळे या शेतकऱ्यांची आर्थिक दुर्बलता यावर मात

करण्याच्या दृष्टीने सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन कार्यक्रम कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत विविध फळझाडांखाली १९९० पूर्वी असलेले २.४२ लाख हेक्टर क्षेत्र धरून सन २०१३-१४ अखेर १८.३६ लाख हेक्टर पर्यन्त पोहोचले असून लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांची संख्या २१.११ लाख आहे.

या योजनेंतर्गत खालीलप्रमाणे पिके घेण्यात येतात.

१) कोरडवाहू पिके - आंबा, काजू, बोर, सीताफळ, आवळा, फणस कोकण, जांभूळ, कवठ, जोजोबा, बांबू, जॅट्रोफा.

२) बागायती पिके - नारळ, संत्रा, मोसंबी, चिकू, डाळींब, पेरू, अंजीर, कागदी लिंबू, सुपारी, तेलताड, रबर, पानपिंपरी.

३) नारळ बागेत अंतरपिकासाठी लागवड - मिरी, लवंग, जायफळ, दालचिनी, सुपारी.

४) औषधी व सुगंधी वनस्पती - आइरल, अर्जुना, असन, अशोका, बेल, गुग्गळ, लोध्रा, रक्तचंदन, शिवण, टेटू, बेहडा, डिकेमाली, हिरडा, रिठा वावडींग, करंज.

५) भात खाचराच्या बांधावर लागवड - आंबा, काजू, पेरू, नारळ व आवळा.

कोकण क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी किमान भूक्षेत्राची मर्यादा ०.१ हेक्टर आणि कमाल १० हेक्टर अशी आहे. कोकणव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील किमान भूक्षेत्राची मर्यादा ०.२० हेक्टर व कमाल ४ हेक्टर अशी आहे. राष्ट्रीय ग्रामीण बँकेचे (नाबार्ड) व्याख्यानुसार मागास जाती, अल्पभूधारक या योजनेचा १००% लाभ घेऊ शकतात. इतर प्रवर्गांना १००% मजुरी आणि ७५% साहित्य रक्कमेची प्रतिपूर्ती मिळते. त्यानुसार ९०% अनुदान शासनामार्फत देण्यात येते.

दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ च्या शासन निर्णयानुसार देय अनुदानाचे वाटप तीन वर्षापर्यंत करण्यात येते. सन २००५-०६ पासून लागवड करण्यात येणाऱ्या फळपिकांकरिता अनुदान वाटप एकूण अनुदानाच्या पहिल्या वर्षी ५० टक्के, दुसऱ्यावर्षी ३० टक्के व तिसऱ्या वर्षी २० टक्के या प्रमाणात देय असून लाभधारकाचे अनुदान त्यांच्या बँक खात्यामध्ये धनाकर्षाद्वारे जमा करण्यात येते. सन २००५-०६ पासून लागवड करण्यात येणाऱ्या सर्व फळपिकाकरिता (बागायती व कोरडवाहू) ज्या लाभार्थ्यांची दुसऱ्या वर्षी ७५ टक्के आणि तिसऱ्यावर्षी ९० टक्के झाडे जीवंत असतील त्या लाभार्थ्यांना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय आहे.

शेत परिस्थिती, फळबाग जीवंत मरीचे प्रमाण तसेच प्रत्यक्ष केलेल्या बाबी लक्षात घेऊन अनुदान वाटप करण्यात येते, सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षात फलोत्पादन कार्यक्रमासाठी अनुक्रमे रु. १६१९.४८ कोटी, रु. १०७०.२९ कोटी व रु. २०.०० कोटी तसेच सन २०१९-२० मध्ये ०.०० कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थी योजने अंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, भूसुधार योजनेचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेतील लाभार्थी आणि कृषी कर्जमाफी योजना २००८ नुसार लहान (small) व सिमांत (marginal) शेतकऱ्यांच्या शेतामध्ये फलोत्पादन कार्यक्रम घेण्यात येतो. याबाबत दिनांक २९ जून, २०११ च्या शासन निर्णयान्वये फलोत्पादन कार्यक्रमाचे आर्थिक मापदंड निश्चित करण्यात आले आहे.

तसेच २०११-१२ वर्षासाठी ५०,००० हेक्टर लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी ३२,१३३ हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे. सन २०१२-१३ वर्षात २०,००० हेक्टर उद्दिष्ट देण्यात आले होते, प्रत्यक्षात २०,७७६ हेक्टरवर लागवड करण्यात आली. सन २०१४-१५ वर्षासाठी देण्यात आलेल्या ११,२०० हेक्टर लक्षांकापैकी १०,६९८ हेक्टरचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे. सन २०१५-१६ वर्षासाठी फलोत्पादन कार्यक्रमासाठी ७००० हेक्टरचा लक्षांक देण्यात आला होता. सन २०१६-१७ मध्ये सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी ३३९४ हेक्टर क्षेत्रावर व विशेष घटक योजनांतर्गत १७५० हेक्टर क्षेत्रावर राबविण्याचे उद्दिष्ट आहे. सन २०१६-१७ या वर्षासाठी जिल्हानिहाय व फळपीकनिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यासाठी संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

सन २०१६-१७ मध्ये रोजगार हमी योजनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या मागेल त्याला शेततळे व ११,००० सिंचन विहीरी या योजनेमुळे मोठ्या प्रमाणात साठा उपलब्ध होणार असल्याने ३० नोव्हेंबर नंतरही फळबाग लागवड करणे शक्य असल्याने फळबाग लागवडीच्या कार्यक्रमास दिनांक १३ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे दिनांक ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

दिनांक २५.०४.२०१७ रोजी मा. मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री (रोहयो) यांच्या सहअध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सन २०१७-१८ पासून राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत नविन फळबाग लागवडीसाठी लक्षांक व अनुदान न देता, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक ०८ जुलै, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये, निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रमास मान्यता देण्यातआलेली आहे.

विभागाच्या दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमीनीवर अमृत महोत्सवी फळझाड / वृक्ष लागवड व फूलपिक लागवड कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. मनरेगा अंतर्गत सुधारीत अमृत महोत्सवी फळझाड/ वृक्ष लागवड व फूलपिक लागवड कार्यक्रम योजनेमध्ये अल्प भूधारक शेतकरी वर्गाचा समावेश करण्यात आलेला आहे. योजनेचा लाभ अल्पभुधारक शेतकऱ्यांनाही घेता येणार असल्यामुळे अधिकाधीक मत्ता निर्माण होवून जास्तीत जास्त रोजगार निर्मीती होणार आहे. पुर्वी प्रमाणे समाविष्ट असलेली पिकांसोबतच खालील पीके नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत. १) केळी (३ वर्ष) २) ड्रॅगनफ्रुट ३) व्हॅकॅडो ४) द्राक्ष, फुलझाड - सोनचाफा, मसाल्याची पिके - १) लवंग, २) दालचिनी, ३) मिरी ४) जायफळ.

**जवाहर विहीर / धडक सिंचन विहीर योजना :** राज्यात रोजगार हमी योजने अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीवर जवाहर विहिरी घेण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. तसेच विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यांकरिता धडक सिंचन विहीर कार्यक्रम सन २००६ पासून घेण्यात आला आहे

याबाबत दिनांक १ जुलै, १९९९ च्या शासन निर्णयानुसार मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत. त्यानुसार लाभार्थ्याकडे ०.६० हेक्टर जमीन असणे आवश्यक आहे. विहिरींचे काम करण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची असून विहीर मंजूर झाल्यापासून १४ महिन्यांचे आत विहिरीचे बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. जवाहर विहीर कार्यक्रमासाठी लाभार्थ्यांच्या निवडीबाबत शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २००८ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. तर धडक सिंचन विहीर कार्यक्रमासाठी लाभार्थ्यांच्या निवडीबाबत शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००९ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

जवाहर विहीर कार्यक्रमांतर्गत लाभार्थी निवडीसाठी दिनांक २४ मे, २००२ अन्वये जिल्हा व तालुका समन्वय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत लाभार्थी निवडीसाठी दिनांक २३ मार्च, २०११ च्या शासन निर्णयानुसार मा. पालक मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समित्यांना लाभार्थी निवडीचे पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत.

या योजने अंतर्गत लाभार्थ्यास विहीर मंजूर झाल्यावर विहिरीचे काम सुरू करण्यासाठी रु. १०,०००/- इतका अग्रीम देण्यात येतो. सदर योजना अनुदानित स्वरुपाची प्रतिपुर्ती योजना असल्याने लाभार्थी जसजसे विहिरीचे काम पूर्ण करील त्यानुसार झालेल्या कामाचे मोजमाप करून लाभार्थ्यांस अनुदान देण्यात येते.

सन २००७-०८ व २००८-०९ मधील जवाहर/धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील देण्यात आलेल्या लक्षांकापैकी लाभार्थी निकषानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच लहान व सिमांत शेतकरी या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांच्या विहिरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र या योजने अंतर्गत वर्ग करण्यात आल्या आहेत. तर इतर लाभार्थ्यांच्या जवाहर/धडक सिंचन विहिरीच्या देय असलेल्या रु. एक लक्ष अनुदानात वाढ करण्यात आली असून सदर अनुदान रु. २.५० लक्ष च्या मर्यादेत करण्यात आले आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत राज्यात ३४९६१ जवाहर विहिरी तर ३५९८५ धडक सिंचन विहिरी पूर्ण झाल्या आहेत. नरेगा अंतर्गत वर्ग करण्यात आलेल्या व सद्य:स्थितीत अपूर्ण असलेल्या १०३२० विहिरी व रद्द केलेल्या विहिरींपैकी परत सुरू करणे शक्य असलेल्या ८००७ विहिरी अशा एकूण १८३२७ विहिरी परत धडक सिंचन विहीर योजनेत पूर्ण करण्याचा निर्णय दि. ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी मंत्रिमंडळाने घेतला आहे. अपूर्ण असलेल्या धडक सिंचन विहिरी पूर्ण करणेसाठी दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जानेवारी, २०१६ अखेर नरेगात वर्ग केलेल्या १०३२० विहिरींपैकी १००७ विहिरी पूर्ण झाल्या असून ९३१३ वहिरी प्रगती पथावर आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या जवाहर/धडक सिंचन विहिर योजनेसाठी सन २०१६-१७ वर्षासाठी रुपये ४०.२८ कोटी, सन २०१७-१८ वर्षासाठी रुपये ५७.९१ व सन २०१८-१९ वर्षासाठी रुपये ४०.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

नियोजन विभागाच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत धडक सिंचन विहीर कार्यक्रमाअंतर्गत दिनांक २७.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पुनर्जिवित करण्यात आलेल्या ८००७ विहिरींपैकी रद्द करण्यात आलेल्या २९८५ विहिरी पून्हा पूनर्जिवित करून पूर्ण करण्यास दिनांक ३० जुन, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

**नागपूर विभागातील सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रम :-**

नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर या पाच जिल्ह्यात सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रम घेण्याचे तसेच सदर कार्यक्रमासाठी लागणारा निधी योजनेत्तर Drouth Mitigation Measures अंतर्गत मदत व पुनर्वसन विभागामार्फत उपलब्ध करून देण्याचे मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश होते. त्यास अनुसरुन दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये एकूण ११,००० विहीरींचा लक्षांक सदर पाच जिल्ह्यांकरिता देण्यात आलेला आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्याकरिता वाढीव ६१४ विहीरींचा लक्षांक देण्यात आलेला आहे. त्याकरिता महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये रु. २७५ कोटी इतका निधी या रोहयो प्रभागास उपलब्ध करुन दिलेला आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार लक्षांक देण्यात आलेल्या ११,६१४ विहिरींपैकी ११,५८४ विहिरींचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून ११,४११ विहीरींचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये नागपूर विभागातील सिंचन विहिरींच्या धडक कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या अतिराक्त १३,००० सिंचन विहिरीपैकी २५३८ विहिरींची कामे सुरु झालेली असून, ८२३ विहिरींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर योजनेतर्गत दिनांक ३० जुन, २०२२ पर्यंत विहिरींचे काम पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर योजनेकरिता आत्तापर्यंत एकूण रु. ९३.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून सदर योजनेंतर्गत विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहिरींचे काम पूर्ण करण्यास दिनांक ३० जून, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

**मागेल त्याला शेततळे :** सदर योजनेस दि. ९ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली असून या योजनेंतर्गत विविध आकारमानाची ७ शेततळी अनुज्ञेय आहेत. लाभार्थ्यांस शेततळ्याच्या आकारमानानुसार अनुदान देय राहणार असून अनुदानाची कमाल मर्यादा रु. ५०,०००/- इतकी आहे. या योजनेसाठी लागणारा निधी Drought Mitigation Measures अंतर्गत मदत व पुनर्वसन विभागाकडून उपलब्ध होणार आहे. मदत व पुनर्वसन विभागाच्या दिनांक १० मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रु. १५० कोटी निधी विभागास उपलब्ध करून दिलेला असून तो आयुक्त, कृषि संचालनालय, पुणे यांना देण्यात आलेला आहे. नियोजन विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ५० पैसे आणेवारीची अट शिथील करून ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यास मान्यता देण्यात येऊन १,११,१११ इतका सुधारीत लक्षांक देण्यात आलेला आहे.

दिनांक २० मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मागेल त्याला शेततळे योजने अंतर्गत कोकण विभागासाठी सुधारित आकारमानाच्या शेततळ्यास एक **विशेष बाब म्हणून** मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये किमान धारण क्षेत्राची अट ०.६० हेक्टर वरून कमी करून ती ०.२० हेक्टर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये (TSP) लाभार्थी निवडीसाठी ठरवून दिलेली ०.६० हेक्टर जमिन धारणेची मर्यादा कमी करून ती ०.४० हेक्टर इतकी करण्यास दिनांक ०२.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच, विभागाच्या दिनांक ०४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार रोजगार हमी योजनेअंतर्गत मागेल त्याला शेततळे योजनेतील शेततळ्याची कामे ही अभिसरणाद्वारे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर योजनेत इनलेट आऊटलेटसह व इनलेट आऊटलेट विरहीत आकारमानाच्या शेततळ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. शेततळ्यांच्या उपरोक्त नमुद आकारमानांनुसार अनुदानाची रक्कम देय होईल. तथापि, देय अनुदानाची कमाल रक्कम रुपये ५०,०००/- इतकी राहील. आत्तापर्यंत १,४९,५९० शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत. अनुदानापोटी रु. ६३८.५५ कोटी इतका निधी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आला आहे.

**शेत रस्तेपाणंद रस्ते**

नियोजन विभाग शासन निर्णय दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ अन्वये पालकमंत्री शेतपाणंद रस्ते/योजनेचे नामकरण "मातोश्री ग्रामसमृध्दी शेत" पाणंद रस्ते योजना/असे करण्यात आले असून सदर योजना अधिक सुटसुटीत करण्यात आली आहे. पाणंद रस्ते हे प्रामुख्याने शेतीमधील कामाकरीता आवश्यक असणाऱ्या साधनांची नेआण करण्याकरीता उपयोगात येतात. पावसाळ्यामध्ये शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रसामुग्रीची वाहतुक शेत/ पाणंद रस्ते योजनेमुळे सुयोग्य झाली आहे या योजनेनुसार

**१. कामे :** राज्यात शेत रस्ते पाणंद रस्ते तयार/शेतरस्त्यावरील अतिक्रमण काढणे, करणे मुरुम व खडी टाकून, दगड, माती शेतरस्त्याचे मजबूतीकरण करणे इत्यादी कामे केली जातात.

**२. निधी :** सदर योजनेस मनरेगामधून अधिक राशी मिळविण्याच्या हेतुने मनरेगा आणि राज्य रोहयो यांचे अभिसरणाद्वारे पुरक कुशल निधी उपलब्ध करणे तसेच मनरेगामध्ये होणारी विविध कामांमधील अकुशल व कुशलच्या संयोजनामधून सुध्दा शेत/पाणंद रस्ते बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेत रस्ते/पाणंद रस्ते करण्याकरिता वित्त आयोग, खासदार/आमदार स्थानिक विकास निधी, ग्रामपंचायतीला जनसुविधांकरीता मिळणारे अनुदान, मोठ्या ग्रामपंचायतीला नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान, गौण खनिज विकास निधी / जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी, ग्रामपंचायतींना मिळणारे महसुली अनुदान, जिल्हा परिषद/पंचायत समितींना सेस मधून उपलब्ध होणारा निधी, ग्रामपंचायतींचे स्व-उत्पन्न, पेसा अंतर्गत उपलब्ध होणारा निधी (अनुसूचित क्षेत्रातील गावांकरिता ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती (सुधार कार्यक्रम) आदिवासी उपाययोजना गावाकरिता, नाविण्यपूर्ण योजना, वैधानिक विकास महामंडळामार्फत उपलब्ध होणारा निधी, इतर जिल्हा योजना (Other District Scheme)), मनरेगा अंतर्गत प्राप्त निधी इत्यादी विविध स्त्रोतांमधून प्राप्त होणाऱ्या निधीमधूनही खर्च करण्यात येतो.

**मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजना**

मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकरिता राज्यभर राबविण्यात येत आहे. सदर योजनेमध्ये रुपये २४.०० लाख एका कि.मी. साठी देण्यात येत असून रुपये १५.०० लाख केंद्र शासनाकडून प्राप्त होत असून उर्वरित रुपये ९.०० लाख राज्य शासन देणार आहे. या आर्थिक वर्षासाठी ३५००० कि.मी. लांबीचे शेत पाणंद रस्त्याच्या आराखड्याला मान्यता देण्यात आली असून यापैकी बहुतांश रस्त्याची कामे सुरू करण्यात आली आहेत.

मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतात खते, बी-बियाणे नेणे, शेतीसाठीची छोटी-मोठी अवजारे नेणे व शेती उत्पन्नातील माल बाजारपेठेपर्यंत पोहोचविणे याकरिता लाभदायक ठरली आहे.

**सुविधा संपन्न कुटुंब व समृद्ध गाव योजना**

रोजगार हमी योजना विभागाने "मी समृद्ध तर, गाव समृद्ध गाव समृद्ध तर पर्यायाने माझा महाराष्ट्र समृद्ध" हे तत्व समोर ठेवून वाटचाल सुरू केली आहे. तसेच, "लेबर बजेट ऐवजी समृद्धी बजेट" राज्यात तयार करण्यात येत आहे. विभागाने गाव हा घटक लक्षात न घेता कुटुंब हा घटक लक्षात घेतला आहे.

तसेच नीती आयोगाच्या अलीकडेच प्रकाशित झालेल्या बहुआयामी दारिद्रय निर्देशांकानुसार राज्याची गरिबी १४.९% असून सदर गरिबी केरळ राज्याच्या २१ पट असल्याचो अहवालावरून दिसून येते. सध्या राज्यातील सर्वच ग्रामपंचायत मध्ये रोजगार हमी योजना राबविणेबाबत मा. मंत्रिमंडळ बैठक क्रमांक मध्ये सुविधा संपन्न कुटुंब व सर्वांगीण समृद्ध गाव मिशन राबविणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील अंग मेहनतीचे अकुशल कामे करणाऱ्या शेतकऱ्यांना शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे, अशा रोजगारातून मत्ता निर्मिती करणे व अशा निर्माण होणाऱ्या मत्तामधून दैनंदिन जीवनास लागणाऱ्या महत्त्वाच्या वस्तू तसेच मानवी विकास निर्देशांकात आवश्यक असणाऱ्या बाबी जसे की आरोग्य, शिक्षण व राहणीमान यावर लक्ष केंद्रित करून सुविधापतीच्या विविध टप्प्यावर संबंधितांना घेऊन जाणे.

याकरिता "सुविधा संपन्न कुटुंब व समृद्ध गाव योजना" राज्यभर राबविण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता नंदादीप गावे निवडण्यात येणार आहेत. तसेच या योजनेच्या सनियंत्रणासाठी व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर मिशन कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे.

**१४. मित्र---**

नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात "महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)" ही संस्था स्थापन करण्यात आली असून सदर संस्थेचे कामकाज दि. ०१ जानेवारी, २०२३ पासून सुरु झाले आहे. नीति आयोगाच्या धोरणाशी सुसंगत मात्र राज्याच्या गरजांची दखल खाजगी क्षेत्र व अशासकीय संस्थांच्या सहभागाद्वारे राज्याच्या जलद आणि सर्वसमावेशक विकास साधणे हा "मित्र" च्या स्थापनेचा हेतू आहे. मित्र ही राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारी " Think-Tank " असेल. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी रु. २०.०० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**तक्ता ४ TABLE IV**

**नियोजन विभागातील (खुद्द) कर्मचारी गोषवारा :**

**Personnel Summary of Planning Department (Proper) :**

| अ.क्र. पदनाम S. No. | वेतनमान Scale of Pay | | पदसंख्या No.of Posts नियोजन (खुद्द) | रोहयो | एकूण | Designation |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 |
| **१. राजपत्रित (गट-अ व ब)** | | | | | | **1. *Gazetted* (Group A and B)** |
| प्रधान सचिव व विकास आयुक्त | Scale Matrix | ... | 1 | .. | 1 | Principal Secretary and Development Commissioner (IAS) |
| सह सचिव | S 27, 123100-215900 | ... | 9 | 2 | 1 | Joint Secretary |
| उप सचिव | S 25, 78800-209200 | ... | | | | Deputy Secretary |
| अवर सचिव | S 23, 67700-208700 | ... | 10 | 1 | 11 | Under Secretary |
| विशेष कार्य अधिकारी (पत व पध्दती) | S 23, 67700-208700 | ... | 1 | .. | 1 | Officer on Special Duty (Credit & System) |
| सह संचालक (खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम) | S 23, 67700-208700 | ... | 1 | .. | 1 | Joint Director M.P.L.A.D.S. |
| उप संचालक | S 20, 56100-177500 | ... | 3 | 0 | 3 | Deputy Director |
| विशेष कार्य अधिकारी | S 20, 56100-177500 | ... | 1 | .. | 1 | Officer on Special Duty |
| लेखाअधिकारी (गट-अ) / सहाय्यक संचालक (लेखा) | S 20, 56100-177500 | ... | .. | 1 | 1 | Assistant Director (Accounts) |
| वरिष्ठ स्वीय सहाय्यक | S 23, 67700-208700 | ... | 1 | .. | 1 | Senior P.A. |
| **एकूण गट-अ** | | | **27** | **4** | **31** | **Total Group A** |
| **गट-ब** | | | | | | |
| कक्ष अधिकारी (अकार्यात्मक वेतनश्रेणी) | S 20, 56100-177500 | ... | 38 | 3 | 41 | Section Officer (Non Functional) |
| कक्ष अधिकारी | S 17, 47600-151100 | | | | | Section Officer |
| संशोधन अधिकारी | S 15, 41800-132300 | ... | 4 | 1 | 5 | Research Officer |
| लेखाधिकारी | S 16, 44900-142400 | ... | .. | 1 | 1 | Accounts Officer |
| ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | S 15, 41800-132300 | ... | 1 | .. | 1 | Librarian and Reference officer |
| लघुलेखक (निवडश्रेणी) | S 16, 44900-142400 | ... | 2 | 1 | 3 | Steno (Selection Grade) |
| **एकूण गट-ब राजपत्रित** | | | **45** | **6** | **51** | **Total Group B Gaz.** |
| **२. गट-ब अराजपत्रित** | | | | | | ***2. Group B-Non Gazetted*** |
| सहायक कक्ष अधिकारी | S 14, 38600-122800 | ... | 44 | 6 | 50 | Assistant Section Officer |
| सहायक लेखाधिकारी | S 15, 41800-132300 | ... | .. | 1 | 1 | Assistant Accounts Officer |
| संशोधन सहायक | S 14, 38600-122800 | ... | 1 | 5 | 6 | Reserach Assistant |
| उच्च श्रेणी लघुलेखक | S 15, 41800-132300 | ... | 8 | 1 | 9 | Steno (Higher Grade) |
| निम्नश्रेणी लघुलेखक | S 14, 38600-122800 | ... | 16 | .. | 16 | Steno (Lower Grade) |
| **एकूण गट-ब अराजपत्रित** | | | **69** | **13** | **82** | **Total Group B Non Gaz.** |
| **३. गट-क** | | | | | | ***3. Group - C*** |
| सांख्यिकी सहायक | S 10, 29200-92300 | ... | 2 | .. | 2 | Stat. -Assistant |
| लघुटंकलेखक | S 8, 25500-81100 | ... | 3 | .. | 3 | Steno -Typist |
| लिपिक-टंकलेखक | S 6, 19900-63200 | ... | 52 | 4 | 56 | Clerk -Typist |
| वाहन चालक | S 6, 19900-63200 | ... | 4 | .. | 4 | Driver |
| **एकूण गट-क** | | | **61** | **4** | **65** | **Total Group C** |

तक्ता ४--चालू **TABLE IV--*Contd.***

| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|---|
| **४. गट-ड** | | | | | | ***4. Group D*** |
| हवालदार | S 3, 16600-52400 | ... | 1 | .. | 1 | Havaldar |
| नाईक | S 3, 16600-52400 | ... | 4 | .. | 4 | Naik |
| आवेष्टक | S 3, 16600-52400 | ... | 1 | .. | 1 | Packer |
| रोनिओ चालक / झेरॉक्स यंत्रचालक | S 3, 16600-52400 | ... | 1 | .. | 1 | Roneo Operator/Xerox Machine Operator |
| शिपाई | S 1, 15000-47600 | ... | 21 | 3 | 24 | Peon |
| **एकूण (गट ड)** | | ... | **28** | **3** | **31** | **Total Group D** |
| **एकूण १ + २ + ३ + ४** | | ... | **230** | **30** | **260** | **Total 1 + 2 + 3 + 4** |

**नियोजन विभाग - राज्य नियोजन मंडळ कर्मचारीविषयक गोषवारा :**

(राज्य नियोजन मंडळाची पदे दिनांक १-८-१९९५ पासून मंजूर)

Personnel Summary of State Plainning Board of Planning Department

| अ.क्र. S. No. | पदनाम | वेतनमान Scale of Matrix | | मंजूर पदे No.of Posts एकूण Total | Designation |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| **१.** | **गट अ** | | | | **1. Group A** |
| | खाजगी सचिव | S 25, 78800-209200 | ... | 1 | Private Secretary |
| **एकूण गट-अ** | | | | **1** | **Total Group A** |
| **२.** | **गट-ब-राजपत्रित/अराजपत्रित** | | | | **2. Group B-Gazetted/Non-Gaz.** |
| | स्वीय सहाय्यक | S 14, 38600-122800<br>S 15, 41800-132300 | ... | 3 | Personal Assistant |
| | लघु लेखक (उच्च श्रेणी/निम्न श्रेणी) | S 15, 41800-132300 /<br>S 14, 38600-122800 | ... | 2 | Steno (Higher Grade) (Lower Grade) |
| **एकूण गट ब** | | | | **5** | **Total Group B** |
| **३.** | **गट क** | | | | 3. Group C |
| | लिपिक टंकलेखक | S 6, 19900-63200 | ... | 2 | Clerk Typist |
| | वाहन चालक | S 6, 19900-63200 | ... | 1 | Driver |
| **एकूण गट क** | | | | **3** | **Total Group C** |
| **४.** | **गट ड** | | | | 4. Group D |
| | चोपदार | S 6, 19900-63200 | ... | 1 | Chopdar |
| | शिपाई/संदेश वाहक | S 1, 15000-47600 | ... | 5 | Peon / Messenger |
| **एकूण गट ड** | | | ... | **6** | **Total Group D** |

**तक्ता ४-चालू TABLE IV-*Contd.***

**मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत असणाऱ्या अधिकारी कर्मचारीविषयक गोषवारा :**

**Summary of Staff under Human Development programme :**

| अ.क्र. S. No. | पदनाम | सुधारित वेतन संरचनेमधील वेतनस्तर (७वा वेतन आयोगानुसार) ग्रेड वेतन Revised Scale | पदसंख्या No.of Posts | Designation |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| १. | आयुक्त | पारिश्रमिक वेतन ... | १ | Commissioner |
| २. | उप आयुक्त (मानव विकास) तथा सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (गट अ) | S 23, 67700-208700 | १ | Dy. Commissioner (H.D) & Asstt. Director, Directorate of Economics & Statistics (Group A) |
| ३. | सहाय्यक आयुक्त मानव विकास तथा उप संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (गट अ) | S 20, 56100-177500 | १६ | Asstt. Commissioner (H.D) & Dy. Director, Directorate of Economics & Statistics (Group A) |
| ४. | लेखाधिकारी, गट-ब लेखा व कोषागारे संचालनालय | S 16, 44900-142400 | १ | Accounts Officer, Directorate of Acctts. & Treasury (Group B) |
| ५. | सहा. जिल्हा नियोजन अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय | S 15, 41800-132300 | २३ | Asstt. Dist. Plaining Officer Directorate of Economics & Statistics |
| ६. | सहायक संशोधन अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय | S 14, 38600-122800 | २३ | Research Assistant, Directorate of Economics & Statistics |
| ७. | सांख्यिकी सहायक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय | S 10, 29200-92300 | २५ | Statstical Assistant, Directorate of Economics & Statistics |
| ८. | लघु लेखक (मराठी) | S 16, 44900-142400 | १ | Steno (Marathi) |
| ९. | लिपिक | S 6, 19900-63200 | २ | Clerk |
| १०. | शिपाई | S 1, 15000-47600 | २ | Peon |
| | **एकूण** | .. | **९५** | **Total** |

**तक्ता ४-चालू TABLE IV-*Contd.***

**"महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर" अंतर्गत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांविषयक गोषवारा :**

**Summary of Staff under Maharashtra Remote Sensing Application Centre, Nagpur :**

| अ.क्र. S. No. | पदनाम | सुधारित वेतन संरचनेमधील वेतनस्तर (७वा वेतन आयोगानुसार) Revised Scale | | पदसंख्या No.of Posts २०२२-२३ 2022-23 | Designation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 | 5 |
| | **(अ) तांत्रिक कर्मचारीवृंद** | | | | **(A) Technical Staff** |
| १. | डायरेक्टर | S 27, 118500-214100 | ... | १ | 1. Director |
| २. | सिनि. रिसोर्सेस सायंटिस्ट | S 25, 78800-209200 | ... | ३ | 2. Sr. Resources Scientist |
| ३. | रिसोर्सेस सायंटिस्ट | S 24, 71100-211900 | ... | ७ | 3. Resources Scientist |
| ४. | असोसिएट सायंटिस्ट | S 20, 56100-177500 | ... | १६ | 4. Associate Scientist |
| ५. | डॉक्युमेंटेशन ऑफिसर | S 15, 41800-132300 | ... | १ | 5. Documentation Officer |
| ६. | सायंटिफिक असोसिएट | S 14, 38600-122800 | ... | ८ | 6. Scientific Associate |
| ७. | लायब्ररी असिस्टंट | S 10, 29200-92300 | ... | १ | 7. Library Assistant |
| ८. | टेक्निशियन | S 10, 29200-92300 | ... | १ | 8. Technician |
| ९. | टेक्निकल असिस्टंट | S 10, 29200-92300 | ... | ३ | 9. Technical Assistant |
| | | | एकूण (अ) | **४१** | Total (A) |
| | **(ब) प्रशासकीय कर्मचारीवृंद** | | | | **(B) Administrative Staff** |
| १०. | ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर | S 16, 44900-142400 | ... | १ | 10. Administrative Officer |
| ११. | अकॉऊंटस् ऑफिसर | S 15, 41800-132300 | ... | १ | 11. Accounts Officer |
| १२. | एक्झिक्युटिव्ह असिस्टंट | S 15, 41800-132300 | ... | २ | 12. Executive Assistant |
| १३. | अकाऊंटंट | S 14, 38600-122800 | ... | १ | 13. Accountant |
| १४. | ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऐड | S 6, 19900-63200 | ... | ५ | 14. Administrative Aid |
| १५. | ड्रायव्हर | S 6, 19900-63200 | ... | ३ | 15. Driver |
| १६. | ऑफिस ऐड / टेक्निकल ऐड | S 1, 15000-47600 | ... | ५ | 16. Office/Technical Aid |
| | | | एकूण (ब) | **१८** | Total (B) |
| | | | एकूण (अ) + (ब) | **५९** | Total (A)+(B) |

**तक्ता ४--चालू TABL IV** *Contd.*

१) शासन निर्णय, नि.वि.आकृति-२०११/प्र.क्र.५/मग्रारो-३, दिनांक ३१.०५.२०११ अन्वये सुधारित आकृतिबंधानुसार विभागीय, जिल्हा,जिल्हापरिषद व तालुका स्तरावरील अस्थायी पदांची माहिती.

२) शासन निर्णय, नि.वि.आकृति-२०१०/प्र.क्र.७३/मग्रारो-३, दिनांक १५.०९.२०११ अन्वये नवनिर्मित मगांराग्रारोहयो- महाराष्ट्र आयुक्तालयातील अस्थायी पदांची माहिती.

३) शासन निर्णय, नि.वि.आस्थाप-२०१३/प्र.क्र.३/मग्रारो-३, दिनांक २४.०५.२०१३ अन्वये काही पदे निरसित करून काही पदे नव्याने निर्माण करण्यात आलेल्या मगांराग्रारोहयो- महाराष्ट्र आयुक्तालय, विभागीय, जिल्हास्तरावरील अस्थायी पदांची माहिती.

४) शासन निर्णय, नि.वि. इपीडी-२०१४/प्र.क्र.२०४/का-१४२१, दिनांक २ जुलै,२०१४ मगांराग्रारोहयो- महाराष्ट्र आयुक्तालयातील अस्थायी पदांची माहिती.

५) शासन निर्णय, नि.वि. आस्थाप-२०१४/प्र.क्र.१६८/मग्रारो-३, दिनांक १३.११.२०१४ अन्वये नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालयासाठी निर्माण करण्यात आलेल्या अस्थायी पदांची माहिती.

६) शासन निर्णय , नि.वि. आस्थाप-२०१४/प्र.क्र.१७२/मग्रारो-३, दिनांक ०६.०७.२०१५ अन्वये नवनिर्मित पालघर जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालयातील मगांराग्रारोहयो कक्षासाठी निर्माण करण्यात आलेल्या अस्थायी पदांची माहिती.

७) शासन निर्णय, नि.वि. आस्थाप-२०१६/प्र.क्र.२९/मग्रारो-३, दिनांक २२.१२.२०२२ अन्वये मगांराग्रारोहयो कक्षासाठी निर्माण करण्यात आलेल्या अस्थायी पदांची माहिती.

८) शासन निर्णय, नि.वि. आस्थाप-२०१६/प्र.क्र.२९/मग्रारो-३, दिनांक २८.१२.२०२२ अन्वये मगांराग्रारोहयो आयुक्त ालय नागपूर, विभागीय आयुक्त , जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व तालुकास्तरावरील कार्यालयातील सुधारित आकृतीबंध तयार करणेबाबत.

**रोजगार हमी योजनेअंतर्गत असणाऱ्या कर्मचाऱ्यांविषयक गोषवारा**

**Personel Summary of Staff under Employment Gurarantee Scheme**

| अ.क्र. S. No. | पदनाम | सुधारित वेतनश्रेणी Revised Scale | | पदसंख्या No. of Posts २०२३-२०२४ 2023-2024 | | Designation |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 | | 5 |
| **अ.** | **राजपत्रित (वर्ग १ व २)--** | | | | | A. *Gazetted* (Class I & II)— |
| १. | आयुक्त (मगांराग्रारोहयो-महा.) | S 27, 118500-214100 | ... | 1 | ... | Commissioner (MGNREGS-MAH.) |
| २. | उपायुक्त (रोहयो.) | S 27, 118500-214100 | ... | 6 | ... | Deputy Commissioner (EGS) |
| ३. | सहा. आयुक्त (अधि. अभि.) | S 25, 78800-209200 | ... | 1 | ... | Superintent Engineer |
| ४. | कार्यकारी अभियंता | S 23, 67700-208700 | ... | 6 | ... | Executive Engineer |
| ५. | अधिक्षक कृषी अधिकारी | S 23, 67700-208700 | ... | 7 | ... | Superintent Agg. off |
| ६. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी म.वि.से. गट-अ | S 20, 56100-177500 | ... | 7 | ... | Deputy Chief Executive Officer |
| ७. | उप जिल्हाधिकारी | S 20, 56100-177500 | ... | 35 | ... | Deputy Collector |
| ८. | उप अभियंता | S 20, 56100-177500 | ... | 33 | ... | Deputy Engineer |
| ९. | सहाय्यक संचालक (लेखा) | S 20, 56100-177500 | ... | 1 | ... | Assistant Director (Accounts) |
| १०. | कृषि अधिकारी वर्ग-२ | S 16, 44900-142400 | ... | 34 | ... | Agricultural Officer-G-2 |
| ११. | गटविकास अधिकारी | S 15, 41800-132300 | ... | 34 | ... | Block Development Officer |
| १२. | संशोधन अधिकारी (सां.) | S 15, 41800-132300 | ... | 1 | ... | Research Officer |
| १३. | लेखाधिकारी | S 16, 44900-142400 | ... | 7 | ... | Accounts Officer |
| १४. | नायब तहसिलदार | S 14, 38600-122800 | ... | 40 | ... | Naib Tahsildar |
| १५. | सहाय्यक लेखाधिकारी | S 15, 41800-132300 | ... | 74 | ... | Assistant Accounts Officer |
| | **एकूण अ (वर्ग १ व २)** | | ... | **287** | ... | Total A (Class I & II) |

**तक्ता ४ समाप्त TABL IV** *Concld.*

| 1 | 2 | 3 | | | 4 | | 5 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **ब.** | **अराजपत्रित (वर्ग ३) --** | | | | | | A. *Non-Gazetted* (Class III)— |
| १. | विस्तार अधिकारी | S 13, | 35400-112400 | ... | 1 | ... | Extension Officer |
| २. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | S 15, | 41800-132300 | ... | 1 | ... | Stenographer (H.G.) |
| ३. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | S 14, | 38600-122800 | ... | 9 | ... | Stenographer (L.G.) |
| ४. | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहा. अभियंता | S 15, | 41800-132300 | ... | 40 | ... | Junior/Section Engineer |
| ५. | कनिष्ठ अभियंता | S 14, | 38600-122800 | ... | 1 | ... | Junior Engineer |
| ६. | संशोधन सहाय्यक | S 14, | 38600-122800 | ... | 1 | ... | Research Assistant |
| ७. | अव्वल कारकून | S 10, | 29200-92300 | ... | 390 | ... | Avval Karkoon |
| ८. | वरिष्ठ सहाय्यक | S 10, | 29200-92300 | ... | 34 | ... | Sr. Assistant |
| ९. | कृषि सहाय्यक | S 8, | 25500-81100 | ... | 1 | ... | Agricultural Assistant |
| १०. | लिपिक-टंकलेखक | S 6, | 19900-63200 | ... | 75 | ... | Clerk-Typist |
| ११. | लेखा लिपिक | S 6, | 19900-63200 | ... | 6 | ... | Account Clerk |
| १२. | लघु टंकलेखक | S 8, | 25500-81100 | ... | 40 | ... | Stenographar |
| | **एकूण ब (वर्ग ३)** | ... | | | **599** | ... | Total B (Class III) |
| **क.** | **वर्ग ४** -- | | | | | | (Class IV) |
| | | | | ... | .. | ... | |
| | **एकूण अ+ब+क** | **...** | | | **886** | **...** | **Total A+B+C** |

**तक्ता ४--समाप्त**

**TABLE IV—*End***

**विकास मंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात असलेल्या कर्मचाऱ्यांचा गोषवारा**

| अ.क्र. पदनाम S. No. | वेतन श्रेणी Scale of Pay | | पदसंख्या No. of Posts २०२२-२०२३ 2022-2023 | २०२३-२०२४ 2023-2024 | Designation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 |
| **(अ) मंडळाच्या अध्यक्षाकरिता :** | | | | | A. for Chairman of Board |
| १. अराजपत्रित वर्ग-२ | | | | | 1. *Non Gazetted* (Class II) |
| स्वीय सहाय्यक | S 15, 41800-132300 | | 3 | 3 | Personal Assistant |
| एकूण १ (वर्ग-२) | | ... | 3 | 3 | ... Total 1 (Class II) |
| २. अराजपत्रित वर्ग-३ | | | | | 2. *Non-Gazetted* (Class III) |
| लिपिक-टंकलेखक | S 6, 19900-63200 | | 3 | 3 | *Clerk Typist* |
| वाहनचालक | S 6, 19900-63200 | | 3 | 3 | Driver |
| एकूण २ (वर्ग-३) | | ... | 6 | 6 | ... Total 2 (Class III) |
| ३. अराजपत्रित वर्ग-४ | | | | | 3. *Non-Gazetted* (Class IV) |
| शिपाई/संदेशवाहक | S 1, 15000-47600 | | 3 | 3 | Peon/Messenger |
| एकूण ३ (वर्ग-४) | | ... | 3 | 3 | ... Total 3 (Class IV) |
| **(ब) मंडळाच्या कार्यालयाकरिता :** | | | | | B. for Board's Office |
| १. राजपत्रित वर्ग-१ व २ | | | | | 1. *Gazetted* (Class I & II) |
| सदस्य सचिव (भा.प्र.से.) | संवर्ग पद | | 3 | 3 | Member Secretary (I.A.S.) |
| सहसंचालक | S 23, 67700-208700 | | 3 | 3 | Joint Director |
| प्रशासकीय नि संधोधन अधिकारी | S 15, 41800-132300 | | 3 | 3 | Administrative cum Research Officer |
| सहाय्यक लेखाधिकारी | S 15, 41800-132300 | | 3 | 3 | Assistant Accounts Officer |
| एकूण १ (वर्ग-१ व २) | | ... | 12 | 12 | ... Total 1 (Class I & II) |
| २. अराजपत्रित वर्ग-२ | | | | | 2. *Non-Gazetted* (Class II) |
| लघुलेखक उच्चश्रेणी | S 15, 41800-132300 | | 3 | 3 | Stenographer Higher Grade |
| संधोधन सहाय्यक | S 14, 38600-122800 | | 6 | 6 | Research Assistant |
| एकूण २ (वर्ग-२) | | ... | 9 | 9 | ... Total 2 (Class II) |
| ३. अराजपत्रित वर्ग-३ | | | | | 3. *Non-Gazetted* (Class III) |
| अव्वल कारकून | S 8, 25500-81100 | | 3 | 3 | Head Clerk |
| लिपिक टंकलेखक | S 6, 19900-63200 | | 3 | 3 | Clerk Typist |
| वाहनचालक | S 6, 19900-63200 | | 6 | 6 | Driver |
| एकूण ३ (वर्ग-३) | | ... | 12 | 12 | ... Total 3 (Class III) |
| ४. अराजपत्रित वर्ग-४ | | | | | 4. *Non-Gazetted* (Class IV) |
| शिपाई | S 1, 15000-47600 | | 6 | 6 | Peon |
| | एकूण ४ (वर्ग-४) | ... | 6 | 6 | ... Total 4 (Class IV) |
| **(क) नियोजन विभागातील स्वतंत्र कक्ष :** | | | | | C. Seperate Sect. in Planning Dept. |
| १. राजपत्रित वर्ग-१ व २ | | | | | 1. *Gazetted* (Class I & II) |
| उप सचिव | S 25, 78800-209200 | | 1 | 1 | Deputy Secretary |
| कक्ष अधिकारी | S 17, 47600-151100 | | 1 | 1 | Section Officer |
| संशोधन अधिकारी | S 15, 41800-132300 | | 2 | 2 | Research Officer |
| | एकूण १ (वर्ग-१ व २) | ... | 4 | 4 | ... Total 1 (Class I & II) |
| २. अराजपत्रित वर्ग-२ | | | | | 2. *Non-Gazetted* (Class II) |
| सहाय्यक कक्ष अधिकारी | S 14, 38600-122800 | | 1 | 1 | Assistant Section Officer |
| | एकूण २ (वर्ग-२) | ... | 1 | 1 | ... Total 2 (Class II) |
| ३. अराजपत्रित वर्ग-३ | | | | | 3. *Non-Gazetted* (Class III) |
| लिपिक टंकलेखक | S 6, 19900-63200 | | 1 | 1 | Clerk Typist |
| एकूण ३ (वर्ग-३) | | ... | 1 | 1 | ... Total 3 (Class III) |
| **एकूण पदे (अ+ब+क)** | | **...** | **57** | **57** | **... Grand Total (A+B+C)** |

**अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ मधील सुस्पष्ट अर्थसहाय्य**

(रुपये हजारांत)

| अनुक्रमांक प्रधान / गौण / उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोन मधील पृष्ठ क्रमांक) | योजनेचे नाव योजनांतर्गत | अर्थसंकल्पीय अंदाज कार्यक्रम खर्च | अर्थसंकल्पीय अंदाज अनिवार्य खर्च | ठळक वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **मागणी क्रमांक ओ-०३** | | | | |
| १ २५०५, ग्रामीण रोजगार | रोजगार हमी योजना-- | .. | .. | रोजगार हमी योजनेच्या कायद्यातील तरतुदीनुसार कामाची मागणी |
| ६०, इतर कार्यक्रम | योजनेखाली बेरोजगार भत्ता व सानुग्रह | | | करणाऱ्या मजुरांना काम न दिल्यास बेरोजगार भत्ता देय आहे. |
| (०१) रोजगार हमी योजना | अनुदान | | | तसेच रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरास कामावर |
| (०२) रोजगार हमी योजनेंतर्गत बेरोजगार भत्त्यांचे प्रदान | | .. | .. | असताना अपघात झाल्यास अथवा मृत्यू आल्यास सानुग्रह |
| (०२)(०१) बेरोजगार भत्ता | | .. | १ | अनुदान देण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. |
| (०२)(०२) वैद्यकीय उपचार इत्यादींसाठी प्रदान | | .. | ३०० | |
| | एकूण ... | | ३०१ | |

**अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ मधील (सुस्पष्ट अर्थसहाय्य आणि सहायक अनुदानाव्यतिरिक्त) अप्रकट अर्थसहाय्याचा तपशील**

(रुपये लाखात)

| अनुक्रमांक | प्रधान/गौण/उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोन मधील पृष्ठ क्रमांक) | योजनेचे नाव | परिमाणावरील अभिप्राय | अर्थसंकल्पीय अंदाज कार्यक्रम खर्च | अर्थसंकल्पीय अंदाज अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| **मागणी क्रमांक ओ-०३** | | | | | |
| १ | २५०५, ग्रामीण रोजगार<br>६०, इतर कार्यक्रम | | | . . | . . |
| | ००१, रोजगार हमी योजना<br>पंचवार्षिक योजनांतर्गत योजना<br>राज्य योजनांतर्गत योजना | | | | |
| | (०१) रोजगार हमी योजना | | | | |
| | (०१) (०२) जवाहर विहीर कार्यक्रम | (अ) खाजगी जमिनीवर जवाहर विहिरी खोदणे | *(अ) सन २०२०-२०२१ मध्ये जवाहर विहिरीवर अपेक्षित खर्च | ४०,०० | .. |
| | (०१) (०३) फलोत्पादन कार्यक्रम | (ब) रोजगार हमी योजने अंतर्गत फलोत्पादन विकास योजना. | (ब) सन २०१४-१५ पर्यंत लागवडीखालील क्षेत्र १८.४६ लाख हेक्टर असून सन २०१५-२०१६ मध्ये ७,००० हेक्टर क्षेत्रामध्ये तसेच सन २०१६-१७ मध्ये ५१४४ हेक्टर क्षेत्रामध्ये फलोत्पादन विकास योजना राबविण्याचा कार्यक्रम घेण्यात आला आहे. | १०,०० | .. |
| | | | | ५०,०० | |

***टीप :--**रोहयो अंतर्गत '३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)' या उद्दिष्टाकरिता करण्यात येणाऱ्या एकत्रित तरतुदीतून वरील खर्च भागविण्यात येतो. तसेच प्रत्यक्ष खर्च वर्ष अखेरीस रोजगार हमी निधीकडे महालेखापाल मुंबई यांचेकडून अंतिमत: वर्ग करण्यात येतो.

अे ५५६-( पु.) अ ४*-३.२०२३

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.